


RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR




Volume - 72 | Issue- 233 | Marathi Daily | Saturday 25/5/2024 | Pages - 6 | Price- Rs. 3

# लायसेन्स टू ड्राईव्ह




१९८८ साली एक इंग्रजी चित्रपट प्रदर्शित झाला 'लायसेन्स टू ड्राईव्ह'. एक तरुण मुलगा ज्याला आपल्या आजोबांच्या आलिशान मोटारीत वाढदिवसानिमित्त आपल्या प्रेयसीला घेऊन फिरायला जायचं असतं, परंतु त्याच्याकडे ड्रायव्हिंग लायसेन्स नसतं (पाश्चात्य देशांमध्ये ते बंधनकारक आहे). तो ड्रायव्हिंग लायसेन्स मिळविण्यासाठी अर्ज करतो पण चाचणीमध्ये नापास होतो. तरीसुध्दा बेधडक घरी न सांगता (फक्त वडिलांना माहिती असतं) आजोबांची मोटार घेऊन मैत्रिणीबरोबर फिरायला जातो, मद्यपान करतो मग अजून मित्र भेटतात सगळे मिळून मद्यपान करतात. मद्यधुंद होऊन मोटारीवर नाचतात, मोटारीला पोचे पडतात. मद्याचा अंमल संपल्यावर खरी परिस्थिती कळते आणि त्याला भीती वाटते, आजोबा ओरडतील याची. परंतु घडतं भलतंच, आजोबा गाडी पाहून जोरजोरात हसायला लागतात आणि म्हणतात एकदा मी तुझ्या वडिलांची बीएमडब्ल्यू अशीच गुपचूप नेली होती आणि अपघात करून आणली होती. तात्पर्य आजोबा, वडील आणि नातू सगळे एकसारखेच!

या चित्रपटाचं कथानक आठवायचं कारण म्हणजे काही दिवसांपूर्वी पुण्यातील कल्याणीनगर येथे अल्पवयीन मुलाकडून झालेला भीषण अपघात. तसा हा चित्रपट विनोदी आहे त्याचप्रमाणे अपघात प्रकरणांत देखील काही विनोदी घटना घडल्या, फरक फक्त एवढाच की हा विनोद विदारक आहे. रविवारी पहाटे अडीच वाजता अपघात होतो त्यात दोन बळी जातात परंतु अल्पवयीन चालकाची वैद्यकिय तपासणी केली जात नाही, त्याच्याबरोबर असणारांची साधी चौकशी देखील केली जात नाही, पोलिस ठाण्यात त्याच्यासाठी पिझ्झा बर्गर मागविले जातात, अल्पवयीन म्हणून लगेचच दुपारी सुट्टीच्या बालहक्क न्यायालयात त्याला सादर केले जाते, त्याची बालगृहात रवानगी न करता केवळ निबंध लिहायला सांगून जामीन दिला जातो हे सर्व हास्यास्पद नाही तर काय? त्यावर विनोदाची कडी म्हणजे दुसऱ्या दिवशी पोलिस प्रशासनाला उपरती होते की त्याने केलेला गुन्हा अतिशय गंभीर असून त्याला अल्पवयीन न ठरवता प्रौढ म्हणून कारवाई करण्यात यावी आणि तेच बालहक्क न्यायालय आधीचा आदेश बदलून त्याची बालगृहात रवानगी करते. ही सर्व कायद्याची चेष्टा, यंत्रणेचा उपमर्द की प्रशासनाचा धनिकांशी प्रामाणिकपणा? सर्व काही अनाकलनीय आणि अराजक. उशिराने का होईना अल्पवयीन आरोपीला आणि त्याच्या वडिलांना कायद्याचा बडगा पाहायला मिळाला तो केवळ पुण्यातील जागरूक नागरिकांचा जनप्रक्षोभ, सेवाभावी संस्थांचा आक्रमकपणा आणि प्रसारमाध्यमांची भूमिका यामुळे. राज्य शासनाला याची थेट दखल घ्यावी लागली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक दिवस पुण्यात तळ ठोकला आणि पोलिस प्रशासनाला कठोर पावले उचलायला लावत घडलेल्या प्रकरणाला कलाटणी दिली. नागपूर येथे देखील अशीच घटना घडली. परंतु त्याची कुठेही जास्त वाच्चता झाली नाही. त्यामुळे जागरूक पुणेकरांना याचे श्रेय द्यावेच लागेल. भारतीय कायद्याप्रमाणे वयाची १८ वर्षे पूर्ण न झालेल्या व्यक्तीला अज्ञान म्हणतात आणि कायद्यामध्ये अज्ञान व्यक्तीच्या हातून घडलेल्या गुन्ह्यात कुठलीही कठोर शिक्षा नमूद केलेली नाही. वयोपरत्वे आपल्या हातून घडलेल्या कृतीच्या परिणामाची कल्पना नसते म्हणून तो अज्ञान. परंतु वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्याशिवाय वाहन परवाना मिळत नाही, वाहन परवाना नसताना वाहन (पान २ वर)



**विविध विशेष**
**ज्ञानेश कुलकर्णी**



## उठाठेव

– विवेक मेहेत्रे



**काय बेजबाबदार मीडियावाले आहेत. हे... खुशाल मी सांगितलेली वादग्रस्त विधानं काटछाट न करताच टी.व्ही. वरून प्रक्षेपित करतात अन् आगीत तेल ओततात!**

### राजेंद्र चोपडा यांचा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे सवाल

# अर्बन बँक घोटाळाप्रकरणी कारवाईची धमक दाखविणार का?



**समाचार/नगर-दि.२५**

गेल्या आठवड्यात पुण्यातील कल्याणीनगर येथे झालेल्या रस्ता अपघातात सुरुवातीला अल्पवयीन आरोपीला वाचविण्याचा प्रयत्न झाला. परंतु पुण्यात उसळलेल्या जनक्षोभाची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गांभीर्याने दखल घेत पोलिसांना कडक कारवाईचे आदेश दिले. याप्रमाणे नगरमध्ये गेल्या वर्षापासून अर्बन बँक कर्ज घोटाळा प्रकरणी जनक्षोभ उसळलेला आहे. बँकेत झालेल्या कर्ज घोटाळ्यामुळे बँकेचा परवाना देखील रद्द झालेला आहे. बँकेची जवळपास ८२० कोटी रुपयांची कर्ज थकबाकी आहे. त्यामुळे ठेवीदारांच्या ठेवी अडकलेल्या आहेत. त्यांना ठेवीची रक्कम मिळू शकत नाही. त्यापैकी अनेकजण हे गरीब व सर्वसामान्य आहेत. अनेकांना औषधोपचारापासून मूलभूत गरजा भागविण्यासाठी पैशांची नितांत गरज आहे, परंतु त्यांच्या हक्काच्याच ठेवींचे पैसे त्यांना वेळेवर मिळू शकत नाही. त्यामुळे ठेवीदारांच्या मनात बँकेच्या गैरकारभाराविषयी मोठा रोष निर्माण झालेला आहे. झालेल्या गैरप्रकारासंदर्भात फॉरेन्सिक ऑडिट झालेले असून त्यामध्ये १०५ आरोपींना दोषी ठरविण्यात आले आहे. त्यापैकी आतापर्यंत फक्त १० ते १२ जणांवर अटकेची कारवाई झालेली आहे. इतर संशयित आरोपी राजरोसपणे फिरत आहेत. त्यांच्यावर पोलिस कारवाई का करत नाहीत? पोलिसांकडून कारवाईस दिरंगाई होत आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वत: गृहमंत्रीदेखील आहेत. त्यांनी या प्रकरणात लक्ष घालून पुण्यातील अपघात प्रकरणाप्रमाणे कारवाईची धमक दाखवावी, अशी अपेक्षा राजेंद्र चोपडा यांनी व्यक्त केली आहे. (पान ३ वर)

### ७ लाख ९ हजारांचा ऐवज लंपास

# भरदुपारी मध्यवस्तीत चोरी

**समाचार/नगर-दि.२५**



नगर शहरातील मध्यवस्तीत असलेल्या गुजर गल्ली येथील स्वामी समर्थ मंदिराच्याजवळ असलेल्या आनंदवन अपार्टमेंट येथे दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅटमधून भर दुपारी सोन्याचे दागिने आणि रोकड मिळून ७ लाख ९ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेला. शुक्रवारी दुपारी एक ते दोनच्या वाजेच्या दरम्यान ही घटना घडली आहे. सदर फ्लॅटमध्ये राहणारे विशाल चंद्रकांत गांधी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दुपारी घर बंद असताना अज्ञात चोरट्यांनी घराच्या दाराचा कडी कोयंडा उचकटून सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली. अपार्टमेंट मध्ये इतर फ्लॅटमध्ये लोकं होते हे विशेष. शहराच्या मध्यवस्तीत ही घटना घडली असल्याने पोलिसांसमोर एक मोठे आव्हान आहे. कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्ह्याची नोंद झाली असून घटना स्थळी अपर पोलिस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय अधिकारी अमोल भारती, कोतवाली पोलिस ठाण्याचे निरीक्षक कोकरे, सपोनि जानकर, योगिता कोकाटे यांनी भेट दिली आहे. पुढील तपास कोतवाली पोलिस ठाण्याच्या सपोनि योगिता कोकाटे करीत आहेत.

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई: सव्वा लाखाचा मुद्देमाल जप्त

# सोनसाखळी चोरी करणारे दोघे जेरबंद




**समाचार/नगर-दि.२५**

सावेडीतील रासनेनगर येथे दि. २४ एप्रिल रोजी महिलेच्या गळ्यातील २५ हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र तोडून नेल्याची घटना घडली.

अशा वारंवार घडणाऱ्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेला गुन्हा उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक दिनेश आहेर यांनी शाखेतील अधिकारी व आमदार यांची पथके तयार करून विविध घडलेल्या घटनांच्या ठिकाणी भेट देऊन तेथील सीसीटीव्ही फुटेज तपासून तसेच गुप्त बातमीदारांमार्फत आरोपींचा तपास केला. त्यानुसार सदर गुन्हा आरोपी सलीम अफजल शेख राहणार छत्रपती संभाजी नगर याने केला असून दिनांक २४ मे रोजी मुकुंद नगर येथील बडी मशीद परिसरात तो सोन्याची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली. पथकाने सापळा लावून सलीम शेख आणि त्याचा साथीदार जिशान सलीम उर्फ सनीमुद्दीन शेख वय २१ या दोन आरोपींना ओळख पटवून ताब्यात घेतले त्यांची सखोल चौकशी केली असता अहमदनगर शहरातील सावेडी व तारकपूर परिसरात त्यांनी चेन स्नॅचिंगचे गुन्हे केल्याची कबुली दिली. (पान ३ वर)

### शहर वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला

# रसिक ग्रुपच्यावतीने सुरेल मैफलीचे आयोजन

**समाचार/नगर-दि.२५**




अहमदनगर शहराच्या ५३४ व्या वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला येथील रसिक ग्रुपच्या वतीने हिंदी मराठी गाण्यांच्या मैफलीचे आयोजन तसेच कर्तव्यदक्ष पोलीस महानिरीक्षक डॉ.बी जी शेखर पाटील यांच्या सेवापूर्ती निमित्त शहरवासीयांच्या वतीने नागरी सन्मान सोहळ्याचे आयोजन सोमवार दिनांक २७ मे रोजी सायंकाळी ६.३० वा. करण्यात आल्याची माहिती रसिक ग्रुपचे अध्यक्ष जयंत येलूलकर यांनी दिली.

अधिक माहिती देताना ते म्हणाले की, हा सोहळा ऐतिहासिक भुईकोट किल्याजवळील निसर्गरम्य अश्या आय लव नगर गार्डन मध्ये होणार असून या कार्यक्रमास जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, आमदार संग्राम जगताप, महापालिका आयुक्त डॉ.पंकज जावळे,जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, कोहिनुर वस्त्रदालनाच्या संचालिका श्रीमती नीता गांधी, देशमुख ज्वेलर्सचे निळकंठ देशमुख यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

शहराच्या समृद्धीत भर घालणाऱ्या या सोहळयास नगरकरांनी उपस्थित रहावे असे आवाहन रसिक ग्रुपच्यावतीने सुदर्शन कुलकर्णी, दीपाली देउतकर यांनी केले आहे.

### 'नगर अर्बन'च्या अवसायकांचे आवाहन

# केवायसी कागदपत्रे १८ जून पूर्वी सादर करा

**समाचार/नगर-दि.२५**

नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या खातेदार व ठेवीदारांनी त्यांच्या खात्यामध्ये जमा असलेली रक्कम डी आय सी जी सी क्लेमच्या माध्यमातून परत मिळवण्यासाठी आपापली केवायसी कागदपत्रे बँकेकडे जमा करणेबाबत यापूर्वी बँक प्रशासनाने अनेकदा आवाहन करून अद्याप अनेक ठेवीदार व खातेदारांनी केवायसी कागदपत्रे बँकेकडे जमा न केल्यामुळे संबंधितांना रकमा परत करण्यात अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे सर्व ठेवीदार व खातेदारांना पुन्हा आवाहन करण्यात येते की, त्यांनी केवायसी कागदपत्रे व क्लेम फॉर्म बँकेच्या नजीकच्या शाखेत अथवा मुख्यालयात १८ जून २०२४ पर्यंत जमा करावेत. (पान ३ वर)

**जगताप हॉस्पिटल व प्रसुतिगृह, अहमदनगर**
**सोनोग्राफी तपासणी रु. 500/- फक्त**
प्रसुतीगृह । स्त्री रोग । वंध्यत्व निवारण । लॅप्रोस्कोपी । शासनमान्य गर्भपात केंद्र
नॉर्मल व सिझेरियन डिलिव्हरी, अत्यल्प दरात दर्जेदार सेवा
**जगताप हॉस्पिटल व प्रसुतिगृह**
पुणे बसस्टँडजवळ, स्वस्तिक चौक, हॉटेल रेडियन्सच्या पाठीमागे, अहमदनगर. मो. 74105 94116, फोन (0241) 7961062.
aBhee

### शिरसुले येथील ८२० झाडांच्या कत्तलीला उच्च न्यायालयाचा तात्पुरता दिलासा

# गायरान जमीन हस्तांतरणाच्या आदेशाला स्थगिती

**संजय वाघमारे**

**समाचार/पारनेर, दि.२५**- निघोज समूह ग्रामपंचायतीसाठी राबवण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा योजनेच्या साठवण बंधाऱ्यासाठी तोडण्यात येणाऱ्या तब्बल ८२० झाडांना उच्च न्यायालच्या आदेशामुळे दिलासा मिळाला आहे.या झाडांची कत्तलीपासून तात्पुरती सुटका झाली आहे. पारनेर तालुक्यातील शिरसुले येथील गट क्रमांक १४३ मधील गायरान जमीन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याच्या नगरच्या अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे सुटी कालीन न्यायाधीश संजय देशमुख यांनी तात्पुरती स्थगिती दिली आहे.आता याप्रकरणी १९ जून २०२४ रोजी पुढील सुनावणी होणार असल्याची माहिती याचिकाकर्त्यांचे वकील स्वप्नील मुळे यांनी दिली.

निघोज, शिरसुले, वडगाव गुंडसह १२ वाड्यांसाठी जलजीवन मिशन योजनेअंतर्गत सुमारे ३० कोटी रुपये खर्चाची पाणीपुरवठा योजना राबवण्यात येत आहे. या योजनेच्या साठवण बंधारा, जलशुद्धीकरण प्रकल्प व पाण्याच्या टाकीसाठी शिरसुले येथील गट १४३ मधील ६ हेक्टर (१५ एकर) जमीन अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग केली आहे. मात्र या जमिनीवर शिरसुले ग्रामस्थांनी तीस, चाळीस वर्षांपूर्वी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड केलेली आहे. पाणीपुरवठा योजनेसाठी वर्ग करण्यात आलेल्या जमिनीवर सरासरी ३० ते ४० वयाची ८२० झाडे उभी आहेत. साठवण बंधाऱ्याच्या कामासाठी ही झाडे तोडण्याला शिरसुले ग्रामस्थांचा विरोध आहे. ग्रामस्थांनी आपला विरोध जिल्हाधिकारी, उपवनसंरक्षक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता यांच्याकडे नोंदवला मात्र कोणीही दखल घेतली नाही. ग्रामस्थांनी अखेर आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर पारनेरच्या वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी झाडे तोडण्यासाठी परवानगी नाकारली. मात्र सरकारी जागा असल्याचे कारण देत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी, वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या आदेशाला न जुमानता तीन वेळा झाडे तोडण्याचा प्रयत्न केला परंतु ग्रामस्थांनी तो हाणून पाडला. (पान ३ वर)



आमचा पाणीपुरवठा योजनेला विरोध नाही तर झाडे तोडण्याला विरोध आहे.आमच्या वाडवडिलांनी तीस, चाळीस वर्षांपूर्वी झाडे लावली.त्यांचे संगोपन केले.गायरानावर २५ ते ३० हजार झाडांची वनराई उभी केली.त्यासाठी आमच्या पिढ्यांनी कष्ट केले. या योजनेच्या कामासाठी निघोज परिसरात दोन, तीन ठिकाणी पर्यायी जागा उपलब्ध असताना झाडे तोडण्याचा अट्टाहास का?

**दिगंबर घोगरे**, याचिकाकर्ते,
**इंदूबाई घोगरे**, ग्रामपंचायत सदस्य.

**12 वी कॉमर्स 2023-2024 - 100% निकाल**
सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!..
अचूक, योग्य आणि परिपूर्ण मार्गदर्शनासाठी..
**दिकोंडा A/C क्लासेस्**
आमच्या क्लासचे दैदिप्यमान यशाचे मानकरी..



| समिप्ता येनगंदूल | तनिष सुरम | अंजली बेत्ती | प्रथमेश मेरगु | अर्जुन वैकर | अमृता दारूटे |
|---|---|---|---|---|---|
| 100/100 | 99/100 | 93/100 | 93/100 | 91/100 | 91/100 |

11 वी/ 12 वी कॉमर्स /FY/SY/TY B.COM/ M.COM/BBA/ BCA साठी
Accountancy / Stat-Math / Costing / Audit / Income-Tax

- 12 वी कॉमर्स बॅचेस 1 जून पासून सुरु होतील.
- 11 वी कॉमर्स /FY/SY/TY B.COM बॅचेस 15 जून पासून सुरु होतील.
- सर्व बॅचेसचे प्रवेश देणे चालू आहे

अथक परिश्रम, कष्ट, मेहनत आणि शिकण्याची जिद्द असणाऱ्या विध्यार्थांनाच आम्ही प्रवेश देतो.
पत्ता - चितळे रोड, पापय्या गल्ली, अहमदनगर. । मो. 8329152257

(पान १ वरुन)

# लायसेन्स टू ड्राईव्ह

चालवू नाही, मद्य प्राशन केल्याने नशा येते, नशेत वाहन चालविण्याने अपघाताचा धोका संभवतो हे समजत असताना देखील करणे याला अज्ञान म्हणायचे का ?

मुलांना पाहिजे तेवढे पैसे आणि लागेल ते दिले की आपली जबाबदारी संपली, असे मानणारा एक उच्चभ्रू वर्ग आहे. आपण दिलेल्या पैशाचे मुले काय करतात, हे विचारण्याचीही गरज त्यांना वाटत नाही. आपला अल्पवयीन मुलगा मद्यप्राशन करतो, हे माहीत असूनही त्याचा पिता त्याला काहीच विचारत नसेल आणि पार्टी करायला प्रचंड महागडी कार घेऊन जायला परवानगी देत असेल, तर या प्रकरणात मुलापेक्षा त्याचे वडील जास्त दोषी आहेत. या घटनेत ठार झालेले अनिष अवधिया आणि अश्विनी कोस्टा एका बेजबाबदार, बेदरकार मस्तवालाच्या कृत्याला बळी पडले. मुळात पहाटे दोन–अडीच वाजेपर्यंत पब सुरू कसा राहतो, त्याकडे पोलिसांचे दुर्लक्ष कसे होते आणि अशा घटना घडल्यानंतरच पोलिस आयुक्त जागे होतात का, असे अनेक प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतात. केंद्र सरकारने केलेल्या नव्या कायद्यानुसार अपघात झाल्यानंतर संबंधित वाहनचालकाने पळून न जाता पोलिसांना माहिती देणे अपेक्षित आहे. जखमींना रुग्णालयात नेण्याची जबाबदारी संबंधित चालकांची आहे. नव्या कायद्यानुसार अशा प्रकरणात दहा वर्षांची शिक्षा प्रस्तावित आहे; परंतु पुण्याच्या घटनेतील दिवटा अपघातानंतर पसार होण्याच्या तयारीत असताना नागरिकांनी चोप देऊन पोलिसांच्या ताब्यात दिले. कल्याणीनगर भागात रविवारी पहाटे झालेल्या या अपघातप्रकरणी अल्पवयीन आरोपीचे वडील आणि पुण्यातील बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल यांना पुणे पोलिसांनी अटक केली. मुळात अठरा वर्षांच्या आतील मुला–मुलींना मद्य देऊ नये, तसेच मद्य देताना त्यांच्याकडे मद्यसेवनाचा परवाना आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी संबंधित बारचालकांवर असताना हा नियम सर्रास धाब्यावर बसवला जातो. पैसे कमावण्याच्या नादात नियमांना तिलांजली देणारांवरही कठोर कारवाई व्हायला हवी. अशा घटना घडल्यानंतर यंत्रणा जाग्या होतात. पोलिस आणि बारमालकांचेही आर्थिक साटेलोटे असते. जनता संतप्त झाली की कारवाईचा तोंडदेखलेपणा केला जातो. आताही अल्पवयीन मुलाला बार आणि पबमध्ये प्रवेश देणाऱ्या हॉटेलच्या मालकावर, बार व्यवस्थापकावर गुन्हा दाखल करण्यात आला; मात्र याच दरम्यान काही धक्कादायक माहिती समोर आली.

अल्पवयीन मुलाने चालवलेली कार केवळ विनाक्रमांकच नव्हती तर या कारची नोंदणीच झाली नव्हती. एवढी महागडी कार विनानोंदणी रस्त्यावर येत असेल तर त्याला पोलिस, उपप्रादेशिक परिवहन विभागही तेवढाच जबाबदार आहे. बंगळुरुमध्ये तात्पुरती नोंदणी करून ही कार पुण्यात आणण्यात आली होती. त्यानंतर मार्चमध्ये नोंदणी करण्याची प्रक्रिया पुण्यातील प्रादेशिक कार्यालयात सुरू होती; मात्र ती अजूनपर्यंत पूर्ण झाली नव्हती. नोंदणीसाठी मात्र १ हजार आणि काही शे रक्कम भरावयाची होती. परंतु ती न भरल्याने नोंदणी न झाल्याची माहिती समोर येत आहे. ही कार इतके दिवस विनानोंदणी रस्त्यावर धावत असताना यंत्रणा काय करत होत्या, असा प्रश्न उपस्थित होतो. इतर वेळी हेल्मेट घातले नसताना कारवाईचा दंड ठोठावणाऱ्या पोलिसांना मार्चपासून ही कार विनाक्रमांक धावते, हे दिसले नाही का, येथेही बड्या धेंडामुळे पोलिस यंत्रणा त्यांना कुर्निसात करण्यात धन्यता मानत होती का, असे प्रश्न उपस्थित होतात. वेदांतचा जबाब त्याची आणि त्याच्या वडिलांची बेदरकार वृत्ती दाखवणारा आहे. मी कार चालवण्याचे रीतसर प्रशिक्षण घेतलेले नाही, वाहन चालवण्याचा परवानाही नाही, वडिलांनी महागडी कार माझ्याकडे दिली तसेच मित्रांसमवेत हॉटेलमध्ये पार्टी करण्यास परवानगी दिली. मी मद्यप्राशन करत असल्याचेही वडिलांना माहिती आहे, असे त्याने सांगितले. वडील बेकायदेशीर वागत असून मुलालाही असेच धडे देत असल्याचे या प्रसंगातून दिसले.

मोटार वाहन कायदा, २०१९ च्या अनुषंगाने कलम १९९ (अ) अंतर्गत अल्पवयीन मुलाचे पालक किंवा गाडीमालकाला अपघातासाठी जबाबदार धरण्यात येईल, असा कायदा असून तीन वर्षे शिक्षेची तरतूददेखील केली आहे. शिवाय आर्थिक दंडदेखील सुनावण्याची तरतूद आहे. भारतीय दंड विधान ३०४ (अ)(अ) नुसार पाल्याने निष्काळजीपणे गाडी चालवल्यास पालकास दोषी धरण्यात येते. वडिलांची गाडी मुलगा चालवत असला तरी संबंधित चारचाकी वाहनाची कायदेशीर कस्टडी ही पालकांचीच असल्याचे नवीन वाहन कायद्यात ग्राह्य धरले आहे. मध्यरात्र असली, तरी पुण्यात ताशी १६० किलोमीटर वेगाने कार चालवली तर तिच्यावर नियंत्रण राहणारच नाही. त्यात मद्यपान केले असल्याने वेगही लक्षात आला नसावा. या अपघातानंतर त्याची वैद्यकीय तपासणीच करण्यात आली नाही, हा आणखी एक अपराध पोलिसांनी केला. येरवडा पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी अगदी किरकोळ कलमे लावून मुलाच्या जामिनासाठी रेड कार्पेट टाकून दिले.

यंत्रणा सडकी असेल तर माणसाच्या जीवाचे मोल किडा–मुंगीतच होणार, यात कोणतीही शंका नाही. न्यायालयाने आरोपीला 'आरटीओ'ला भेट देऊन वाहतूक नियमांची माहिती घेऊन १५ दिवस येरवडा विभागातील पोलिसांसोबत वाहतूक नियंत्रण करावे, वाहतूक जागृतीचे फलक रंगवावे आदि शिक्षा दिली. मानसोपचार तज्ज्ञाकडे जाऊन त्याला उपचार घ्यावे लागणार आहेत. 'रस्ते अपघातांचे परिणाम आणि त्यावरील उपाय' या विषयावर निबंध लिहायला सांगितला. मात्र जनक्षोभ उसळताच या दिवट्याला पुन्हा नव्या कलमांखाली दोषी धरण्यात आले आणि बापासह तुरुंगात धाडण्यात आले. मात्र मुद्दा हा आहे की असा दुर्दैवी प्रकार घडणार नाही, याची शाश्वती पोलिस यंत्रणा आणि राज्य प्रशासन देऊ शकणार आहे का?

दुसरीकडे ज्या दोघांचा या अपघातात बळी गेला त्याचे कुठल्याही प्रकारे समर्थन नक्कीच होऊ शकत नाही, परंतु रात्री अडीच वाजेपर्यंत तरुण तरुणी एकत्र मिळून पार्ट्या करतात, इकडे तिकडे फिरतात ही बाब देखील दुर्लक्षित करून चालणार नाही. बेबंद आणि बेधुंद तरुणाई पुण्यातील रस्त्या–रस्त्यांवर दिसत आहे. आजचे कोरेगांव पार्क आणि विमाननगर मधील रात्रीचे चित्र पाहिल्यास पुण्याला राज्याची सांस्कृतिक राजधानी का म्हणायचे हा प्रश्न पडतो. कुण्या एकेकाळी प्रसिध्द असलेली पेठ्यांमधील संस्कृती कशी आणि कधी पब आणि रेव्ह पार्ट्यांमध्ये लोप पावली ते कळलेच नाही. पुणे विद्येचे माहेरघर होतेच, पण पुढे आयटी क्षेत्रामुळे तरुणाई पुण्यात येण्याचे प्रमाण प्रचंड वाढले. आयटी क्षेत्रात बऱ्याच वेळा वेगवेल्या शिफ्टमध्ये काम करावे लागते. त्यामुळे सुटीच्या दिवशी एकत्र भेटणे , पार्टी करणे हे मान्य असले तरी वेळेचं बंधन आणि मर्यादा नक्कीच पाळल्या गेल्या पाहिजेत. पुण्यात अनेक अविवाहित मुलं – मुली शिक्षण आणि नोकरीनिमित्त राहत आहेत. त्यांचे पालक कुठे लांब राहत आहेत. त्या सर्व पालकांची झोप उडविणारी ही घटना आहे. आपली मुलं रात्री सुरक्षित त्यांच्या निवासस्थानी पोहोचल्याशिवय त्यांना झोप येणे अशक्य आहे. सध्या निवडणुकीचे वातावरण आहे . काही पक्षांकडून प्रचार केला जात आहे की धर्माचे रक्षण करा. त्याआधी खरी गरज आहे ती संस्कृतीच्या रक्षणाची !

'लायसेन्स टू ड्राईव्ह' सिनेमाप्रमाणे कल्याणीनगर अपघात प्रकरणात काहीसे साधर्म्य नक्कीच आहे. प्रसंग वेगळे असेल तरी प्रश्न एकच दोषी आजोबा, वडील की नातू ?

त्याच बरोबर सर्व कायदे, नियम धाब्यावर बसवून त्यांना साथ देणारी यंत्रणा ही त्यांच्यापेक्षाही महाअपराधी . असेच जर चालू राहिले तर सर्वसामान्यांचे काय , हा प्रश्न पडतो. या चित्रपटानंतर एकच वर्षांनी अजून एक इंग्रजी चित्रपट आला त्याचे शीर्षक होते 'लायसेन्स टू किल'. भविष्यात असं तर होणार नाही ना..?

# विक्री वाढविणारे नवे जाहिरात तंत्र

## जाहिरात'बाजी'

**जाहिरात कशासाठी करायची तर एखाद्या उत्पादनाची विक्री वाढावी या हेतूने. आजकाल विपणन म्हणजे मार्केटिंग करताना नवनवीन पद्धती सातत्याने वापल्या जातात. त्यात स्ट्रॅटेजी नावाचा एक भाग असतो. जाहिरात करतानासुद्धा स्ट्रॅटेजीवर जरा जास्तच काम करावं लागतं.**

आजचा लेख, जे लोकं व्यवसाय करतात, ज्यांचा ब्रॅंड आहे, प्रॉडक्ट आहे, मार्केटींग करतात, मोठा बिझनेस आहे, जाहिराती करतात अशा मंडळींसाठी.

अनेकदा लोक मला विचारतात की जाहिरात नेमकी कधी करावी? मी सांगतो, जाहिरात सिझन नसेल तेव्हा जरूर करावी. सिझनमध्ये जाहिरात ग्राहकांना आकर्षित करते. पण सिझन नसताना आपण आपली सर्व्हिस किंवा प्रॉडक्ट त्यांच्यापर्यंत पोहोचले तर त्याचा उत्तम परिणाम सिझनमध्ये दिसतो. म्हणजे उन्हाळा सुरु होण्याच्या आधीपासून कोल्डड्रिंक्सच्या जाहिराती यायला सुरुवात होते. पण पावसाळ्यात, हिवाळ्यात विविध कार्यक्रमांचे स्पॉन्सर्स, विविध गोष्टी करून आपला ब्रॅंड, उत्पादन सतत लोकांसमोर रहावं यासाठी सगळ्या कोल्डड्रिंक्स कंपन्या प्रयत्न करताना दिसतात.

३ प्रकारच्या तंत्रांचा विचार प्रामुख्याने जाहिराती करताना केला जातो –

१. ब्रॅंडला किंवा सर्व्हिस वा प्रॉडक्टला चालना देण्यासाठी आणि जास्तीत जास्त प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी मास मीडियाचा वापर केला जातो. ह्या तंत्राला -Above the Line (ATL) मार्केटिंग म्हणतात. प्रॉडक्ट अथवा ब्रॅण्डविषयी जागरूकता आणि त्यांची ओळख निर्माण करण्यात अथवा टिकवून ठेवण्यास मदत करते. टेलिव्हिजन, रेडिओ, प्रिंट मीडिया, इंटरनेट, वर्तमानपत्रे, पोस्टर्स, बॅनर, होर्डिंग्स आणि मासिके ही ह्या तंत्राची काही प्रमुख उदाहरणे आहेत. एखादे उत्पादन सातत्याने ह्या सगळ्याच मीडियावर झळकायला लागले किंवा आपल्याला दिसायला लागले तर त्यांची -ATL स्ट्रॅटेजी काम करते आहे असा त्याचा अर्थ होतो.

२. Blow The Line (BTL) तंत्राचा वापर लहान पण विशिष्ट गटाला लक्ष्य करण्यासाठी केला जातो. प्रॉडक्टची थेट विक्री वाढवण्यावर भर दिला जातो. उदाहरणार्थ प्रदर्शने, ट्रेड–शो, टेली मार्केटिंग, गिफ्ट व्हाऊचर, सेल्स प्रमोशन, पब्लिक रिलेशन, शॉप फ्रंट ॲक्टीव्हीटी, सोशल मीडिया, फ्लायर्स, कॅटलॉग, प्रायोजकत्व इ. ह्यामुळे विशेष एखाद्या निमित्ताने समोर येणाऱ्या ग्राहकाला चटकन आपलं प्रॉडक्ट किंवा सर्व्हिस समजावी हा हेतू असतो. या स्ट्रॅटेजीमध्ये Push Sales या प्रकारात म्हणजे विक्री केंद्रित जाहिरातींकडे जास्त लक्ष दिले जाते.

३. Through The Line (TTL) या मार्केटिंग तंत्रात -ATL/BTL तंत्राचे सुयोग्य असे मिश्रण असते. TTL स्ट्रॅटेजी हा एक नव्याने उदयास आलेला प्रकार आहे. डिजिटल युगात ह्याची भरभराट होत आहे. मोठ्या प्रमाणावर जाहिराती करून (अनेकदा भडीमार वाटू शकतो) आणि ग्राहकाच्या वैयक्तिक पातळीवर पोहोचून त्याला उत्पादन, सेवा किंवा ब्रॅंड समजावून सांगणे या प्रकारात घडते. सध्याच्या काळातल्या निवडणूक जाहिराती पाहिल्या तर चटकन समजून येईल. महाराष्ट्रातले निवडणूक टप्पे संपल्यावर एकदम त्या जाहिराती तुमच्या आमच्या मोबाईल स्क्रीनवरून, टीव्हीवरून, वर्तमानपत्रातून, युट्यूबवरून गायब झालेल्या जाणवतात. ३६० डिग्री मार्केटिंग, डिजिटल मार्केटिंग, डिजिटल पीआर या माध्यमातून TTL स्ट्रॅटेजी काम करते. यासाठी एक्स्पर्ट लोकांची टीम मात्र लागते.

अर्थात -ATL, BTL असो की TTL हे करत असताना जाहिरात एजन्सी सोबत दीर्घ चर्चा आणि प्लॅन करण्याची गरज असते. ३६०–डिग्री ॲडव्हर्टायझिंग स्ट्रॅटेजी आखत असताना ब्रॅण्डशी संबंधित म्हणजे ब्रॅण्डला सूट होतील अशी सगळी माध्यमे आणि त्यांचा सुयोग्य वापर याबद्दल विचार होणे आवश्यक असते.

आजच्या डिजिटल युगात मोठमोठे ब्रॅण्ड्स ३६०–डिग्री ॲडव्हर्टायझिंग साठी खालील माध्यमे जास्त प्रमाणात वापरतात.




१) प्रभावी वेबसाइट

२) संभाव्य ग्राहककेंद्री SEO धोरण (इंटरनेटवर आपला ब्रॅंड कीवर्डस् आणि इतर गोष्टीतून सातत्याने समोर आला पाहिजे यासाठी केलेली तांत्रिक गोष्ट)

३) गुगल, फेसबुक, इंस्टाग्राम, लिंकडीन या आणि अशा समाज माध्यमांवर जाहिरात

४) ईमेल मार्केटिंग

५) सोशल मीडिया प्रमोशन अन मार्केटिंग

६) कन्टेन्ट मॅनेजमेंट (यामध्ये ब्रॅंड, ब्रॅंड संदर्भात काम करणाऱ्या लोकांचे सोशल मीडिया हॅन्डल्स यावरच्या कन्टेन्ट संदर्भात कन्सल्टंसी येते)

७) समक्ष भेटून ब्रॅंड पोहोचवणे (इन पर्सन ॲडव्हर्टायझिंग)

८) जनसंपर्क यंत्रणा राबवणे. उदा. आफ्टर सेल्स सर्व्हिस आणि त्या संदर्भात सातत्याने संपर्कात राहणे, त्याचा आढावा घेणे.

९) पारंपरिक प्रकारात मोडणाऱ्या जाहिराती छापील जाहिराती, होर्डिंग्स, टीव्ही ॲडस् वगैरे

३६०–डिग्री जाहिरात तंत्रांचा अवलंब करणे हा संभाव्य ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. मार्केटिंग आणि जाहिरात ही तशी पाहायला गेलं तर एकाच आईची दोन लेकरे. दोघेही काम एकाच स्ट्रॅटेजीनुसार करतात. मात्र त्या दोघांनी परस्परपूरक काम करणं आवश्यक असतं. आजचा हा लेखांक जरा टेक्निकल झाला आहे, पण आपल्या शहरात असे अनेक ब्रॅण्डस् आहेत जे जाहिराती करताना चुका करतात. एक निश्चित स्ट्रॅटेजी, त्याचा दीर्घकालीन प्लॅन यावर विचार करणे आवश्यक असते हाच लेखाचा उद्देश.

**– शंतनू खानवेलकर**




## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाच्या भेटी होतील. स्थावर प्रश्नात समाधान लाभेल. नव्या विचारांना चालना मिळू शकेल.
- **वृषभ** : रखडलेली कामं आज पूर्ण होतील. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. मंगल कार्याची बोलणी होतील.
- **मिथुन** : व्यवसायात अनपेक्षित दिलासा मिळेल. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील. मित्रांचं सहकार्य लाभेल.
- **कर्क** : मोठे करार तुर्तास नको. आर्थिक बाबतीत फसवणूक संभवते. जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील.
- **सिंह** : खऱ्या हितचिंतकांची पारख करा. कसल्याही आमिषाला बळी पडू नका. विचारानं रहायला हवं.
- **कन्या** : कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल. मुलांची अपेक्षित प्रगती होईल. प्रिय व्यक्तिंचा सहवास लाभेल.
- **तूळ** : कौटुंबिक सौख्य लाभेल. गृहसजावटीच्या क्षेत्रात अनुकूलता राहील. व्यवसायात लाभ होईल.
- **वृश्चिक** : दिवसाची सुरूवात उत्तम होईल. घेतलेले निर्णय योग्य ठरतील. खर्च वाढला तरी प्राप्तीही वाढेल.
- **धनु** : आर्थिक चिंता राहील. यंत्र तसंच वाहन वापरताना काळजी घ्या. घाईने निर्णय घेऊ नयेत.
- **मकर** : कामाचा उत्साह वाढेल. व्यवसायात संधी लाभतील. मोठ्या खरेदीचे व्यवहार सुकर होतील.
- **कुंभ** : कर्तव्याकडे अधिक लक्ष द्या. चैनीच्या बाबींकडे अधिक ओढा राहील. अनुभवींचा सल्ला घ्यावा.
- **मीन** : घरगुती समस्यांचा ताण राहील. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी. विवाहाची बोलणी रखडतील.

## २६ मे — दिनविशेष

**१९८६:** युरोपीय संघातील देशांनी युरोपचा झेंडा स्वीकारला.
**२०००:** चित्रकार प्रभाकर शिरुर यांचे निधन.
**२०१३:** सचिन तेंडुलकरने आयपीएलमधून निवृत्तीची घोषणा केली.
**२०१७:** माजी पोलीस महासंचालक के.पी.एस.गिल यांचे निधन.
**२०१८ :** 'पाकिजा'सह असंख्य चित्रपटांमध्ये काम करणारी अभिनेत्री गीता कपूर यांचे निधन.

## आरोग्यमंत्र — वजन वाढवण्यासाठी...

योग्य आणि वजन वाढवणारा आहार ठरवताना काही बाबी लक्षात घ्यायला हव्या. त्याबाबत सविस्तर माहिती घेऊ.

✻ उत्तम पोषणमूल्यं असणारा आहार घ्या. आहारात प्रथिनयुक्त मांसाचा समावेश करा. प्रथिनांमुळे तुमचे स्नायू बळकट होतील. हातसडीच्या धान्यांमध्ये उच्च दर्जाची कर्बोदकं असतात. डाळींचं प्रमाण वाढवा. केळी, तूप, लोणी, खोबरेल तेल असे पदार्थ खा. जंक फूड टाळा. ✻ प्रथिनं आणि चांगल्या कर्बोदकांनी युक्त प्रोटीन बार, पिनट बटर, हुमुस अशा पदार्थांना न्याहरीत स्थान द्या. ✻ एका वेळी पोटभर जेवू नका. थोड्या थोड्या वेळाने थोडं खात रहा. कॅलरींचं प्रमाण वाढवताना पोटावर अत्याचार करू नका. ✻ एअरोबिक्सऐवजी शारीरिक क्षमता वाढवणारे व्यायाम करा. वेट लिफ्टिंग किंवा योगासनांचा पर्याय निवडता येईल. ✻ वजन वाढवण्यासाठी आहारात प्रथिनांचा समावेश करणं गरजेचं आहे. वजन वाढवण्याचं उद्दिष्ट साध्य करायचं असेल तर प्रथिनांना पर्याय नाही. प्रथिनांच्या कमतरतेमुळे बीएमआयमध्ये घट होते. सोयाबीन, प्रोटीन पावडर, प्रोटीन शेक, शेंगदाणे, पिनट बटर, चिकन, डाळी, दुग्धजन्य पदार्थ यांना आहारात स्थान द्या. ✻ शरीरात चांगल्या बॅक्टेरियांची कमतरता असेल तर वजन वाढीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे आहारात दही, दूध, ताक, योगर्टसारख्या पदार्थांचा समावेश करा. यामुळे शरीराला चांगल्या, आरोग्यकारक बॅक्टेरियांचा पुरवठा होईल.



## महत्त्वपूर्ण काही — समुद्राखालचे ज्वालामुखी

पृथ्वीवर भूपृष्ठावर असलेल्या ज्वालामुखींच्या बातम्या आणि चित्रं आपण पहात असतो पण पृथ्वीवरचे सर्वाधिक ज्वालामुखी हे सागरतळी आहेत. सागरमध्यावर कटक किंवा दऱ्या असतात. त्यामुळे पृथ्वीचा हा भाग फुटबॉलच्या पृष्ठभागाप्रमाणे शिवल्यासारखा दिसतो. त्यातले कटक म्हणजे सागरांतर्गत पर्वतरांगा... या ज्वालामुखींची मुखं एका रेषेत आल्याने तयार झालेल्या आहेत. भूपृष्ठातील शीलारस सहज वर येऊ शकेल अशा या पातळ्यांवर ज्वालामुखीचे उद्रेक होऊन लाव्हा रस बाहेर पडतो. इथे सागरी पाण्याचा दाब खूप असतोच पण तापमान शून्य सेल्सिअसच्या जवळपास असतं. लाव्हा बाहेर पडताच वरचा भाग थिजतो पण त्याखालचं पाणी उकळतं आणि त्यामुळे तो थोडा वर उचलला जातो. त्यानंतर खालून उरलेला लाव्हा वाहू लागतो. दरम्यान, उकळत्या पाण्याची वाफ वर जायचा प्रयत्न करते आणि हा लाव्हा सच्छिद्र बनतो, असा प्राथमिक निष्कर्ष संशोधक काढतात. मात्र अजूनही त्यावर अभ्यास व्हायला हवा. पृथ्वीच्या अंतरंगात डोकावू पाहणाऱ्यांच्या बुद्धीला हे चांगलं खाद्य आहे.

## सल्ला मोलाचा — हेअर केअर इन समर

केस खराब होण्यामागे हीट स्टायलिंग, केसांची काळजी न घेणं, प्रदूषणाचे परिणाम आदी कारणं असू शकतात. म्हणूनच केसांची काळजी घ्यायलाच हवी. ✻ केस धुताना सगळा शँपू निघून जायला हवा. शँपू केसांमध्ये तसाच राहिला तर डोक्याच्या त्वचेला संसर्ग होतो आणि विविध समस्या उद्भवतात. ✻ केस शॅम्पूने धुतल्यानंतर कंडिशनिंग करणं गरजेचं आहे पण कंडिशनर डोक्याच्या त्वचेला लावू नये. केवळ केसांची लांबी कंडिशनरने कव्हर व्हायला हवी. कंडिशनरची योग्य मात्रा वापरणंही गरजेचं आहे, कारण केसांना अधिक मात्रेत कंडिशनर लावलं तर ते चिपचिपीत आणि जड वाटतात. ✻ केसांची मुळं दुभंगलेली असल्यास वाढ खुंटते. केस निस्तेज दिसू लागतात. अशा वेळी ट्रिम करणं अत्यावश्यक ठरतं. ✻ हॉट ऑईल मसाज केसांच्या आरोग्यासाठी अनुकूल ठरतं. खोबरेल तेल आणि बदाम तेल एकत्र करुन कोमट करावं आणि डोक्याला मसाज करावा. यामुळे रक्तप्रवाह सुधारतो आणि केसांना पौष्टिक घटकांचा लाभ मिळून केसगळती कमी होते.

## पंचांग

**रविवार, २६ मे २०२४**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
वैशाख कृ.३, नक्षत्र : साध्य
चंद्रराशी : धनु , वणिज बव योग
सूर्योदय : ६.०३, सूर्यास्त : ७.०८

## फॉरवर्डस

**चुकांचं विश्लेषण करणारी किती सुंदर शब्दरचना आहे पहा...**

एक गलती आपका अनुभव बढा देती है...

और अनुभव आपकी गलतियाँ कम कर देता हैं।

## टेक्नो टॉक

स्मार्टफोन, कॉम्प्युटर स्क्रीनच्या सततच्या वापरामुळे डोळ्यांवर ताण येतो हे आपण बरेचदा ऐकलं आहे. मात्र याकडे आपलं दुर्लक्ष होतं. याबाबत सातत्याने संशोधन सुरू असून टॉलेडोतल्या एका विद्यापीठाने केलेल्या संशोधनातून धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. आपण याकडे लक्ष देणं गरजेचं आहे. स्मार्टफोन किंवा कॉम्प्युटर स्क्रीनवर सतत डोळे लावून बसणाऱ्या माणसांची दृष्टी पन्नाशीपर्यंत अधू होऊ शकते, असं हे संशोधन सांगतं. त्यामुळे आपला 'स्क्रीन टाईम' कमी करण्यावर भर द्यायला हवा.

## करिअरवाटा — हार्डवेअरमधील तज्ज्ञ व्हा

आजकाल मोबाईल फोनचे अगणित डिझाईन्स बाजारात आले आहेत आणि त्यात वरचेवर नवनवीन डिझाईन्सची भर पडत आहे. विशेष म्हणजे या प्रत्येक डिझाईनच्या निर्मितीमध्ये शेकडो अभियंते आणि डिझाईनर्स गुंतलेले असतात. केलेल्या डिझाईननुसार प्रत्यक्षात तो हॅन्डसेट किंवा संगणक विकसित करणं, त्यात सॉफ्टवेअर बसवणं, त्यांची चाचणी घेणं आणि शेवटी उत्पादन करून विक्रीसाठी तयार करणं अशा साऱ्या कामांमध्ये



हजारो लोक गुंतलेले असतात. यावरूनच कारकिर्दीची ही वाट किती महत्त्वाची आहे, हे लक्षात येतं. हार्डवेअरच्या शिक्षणाबाबत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ हार्डवेअर टेक्नालॉजी या संस्थेनं उत्तम कार्य केले आहे. हार्डवेअरचे प्रशिक्षण देणारी ती देशातली अग्रगण्य संस्था आहे. या संस्थेतील अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या तंत्रज्ञांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रमाणपत्र दिलं जातं आणि या संस्थेतून बाहेर पडलेले तंत्रज्ञ नंतर अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करतात. जेटकिंग हीसुध्दा या क्षेत्रातली नावाजलेली कंपनी आहे. त्याशिवाय इतरही अनेक संस्थांमध्ये हार्डवेअरचं प्रशिक्षण दिलं जातं. एकंदर हार्डवेअरचं प्रशिक्षण संबंधितांचं नशीब खुलवणारं ठरणारं आहे, असं म्हटल्यास वावगं होणार नाही.

## खेचाखेची — पुढल्या वर्षी

रमेश मुलाखतीसाठी एका कंपनीत जातो. मुलाखत चांगली होते. बॉस सांगतात,'आम्ही तुम्हाला हे पद देत आहोत. पहिल्या वर्षी वार्षिक वेतन पाच लाख इतकं असेल. पुढल्या वर्षी ते दुप्पट होईल.

.

हे ऐकून रमेश उठून जायला लागतो. बॉस विचारतो,' काय हो, काय झालं?'

.

.

रमेश: जाऊ दे... मग पुढल्या वर्षीच जॉईन होतो ना मी...!

## वेगळं काही

अंदाजे दोन अब्ज वर्षांपूर्वी पृथ्वीवर प्रचंड उष्णता वाढली आणि सजीवांचा नायनाट झाला. उष्णतेच्या या कडाक्यात सजीवांच्या अनेक जाती नष्ट झाल्या. त्यावेळी पृथ्वीचं सरासरी तापमान २९ डिग्री सेल्सिअसपर्यंत पोहोचलं असावं असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. म्हणूनच आज पृथ्वीचं तापमान सरासरी १५ डिग्री सेल्सिअसच्या पुढे जात असल्यामुळे संशोधक चिंता व्यक्त करतात. येत्या दहा वर्षात तापमान याच गतीने वाढत राहिलं तर इतिहासाची पुनरावृत्ती होण्याचा मोठा धोका त्यांनी वर्तवला आहे. सध्या ग्रीन हाऊसमधून होणारं वायूउत्सर्जन, ग्लोबल वॉर्मिंग आदी कारणांमुळे पूर्वीसारखीच स्थिती निर्माण झाली आहे.

## माय स्पेस — जॉबीमूनला जायचंय?

काळानुरुप ट्रेंड्स बदलत असतात. सध्या जॉबीमूनचा ट्रेंड बघायला मिळत आहे. आधीची नोकरी बदलल्यानंतर नव्या नोकरीवर रुजू होण्याआधी स्वत:ला वेळ देण्यासाठी केलेल्या ट्रीपचं आयोजन म्हणजे जॉबीमून. वर्षानुवर्षं एकाच नोकरीत संपूर्ण हयात घालवण्याचे दिवस कधीच मागे पडले. आजची पिढी सतत नवी नोकरी आणि उत्तम पॅकेजच्या शोधात असते. त्यामुळे आज या कंपनीत तर उद्या त्या कंपनीत धावाधाव सतत सुरु असते. अशा वेळी जुन्या



नोकरीतला ताणतणाव, हेवेदावे यातून सुटका मिळवण्यासाठी जॉबीमूनचा आधार घेण्याकडे तरुणाईचा कल वाढता आहे. नोकरी सोडल्यानंतर आपण कमवत नाही ही जाणीव अनेकांच्या मनाला घेरून टाकते. यामुळे डिप्रेशन येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नोकरीचा राजीनामा दिल्यानंतर या ताणातून सुटका मिळवण्यासाठी जॉबीमूनला जावं असं अनेकांचं मत आहे. नव्या नोकरीला सुरुवात करताना मनावर ताण असेल तर पूर्ण क्षमतेने काम करणं अशक्य ठरतं. त्यामुळे नव्या नोकरीवर आनंदी आणि तणावरहीत मनस्थितीत रुजू होण्यासाठी जॉबीमून हा सर्वोत्तम पर्याय आहे.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा–अहमदनगर, पिन कोड– ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा– अहमदनगर, पिन कोड– ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक– स्वाती महेंद्र कुलकर्णी.
दूरध्वनी– २३४५२७०, २३४७०८६, मो.– ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

PDF Compressor Free Version


# समाचार

शनिवार, दि. २५ मे २०२४ पान ३


## लाभांशाचा अर्थ !



भारतीय रिझर्व बँकेने आर्थिक वर्ष २३ /२४ साठी केंद्र सरकारला सर्वोच्च लाभांश (२.११ लाख कोटी रु.) देण्याचा निर्णय घेतला. आर्थिक क्षेत्रातील तज्ञ या निर्णयाकडे निरनिराळ्या चष्म्यातून पाहत आहेत. काहींच्या मते अर्थव्यवस्था योग्य मार्गावर धावत असताना व वस्तू व सेवा करातील विक्रमी संकलन तसेच वैयक्तिक करदाते वाढत असतानाही रिझर्व बँकेने केंद्र सरकारला वाढीव लाभांश देण्याची गरजच काय ? त्याऐवजी ही रक्कम मध्यवर्ती बँकेच्या राखीव साठ्यात रूपांतरित करून संकटाच्या वेळी वापरण्याच्या राखीव गंगाजळीत वाढ करता आली असती. हे जरी खरे असले तरी मागील पाच दहा वर्षांपासून जागतिक पटलावरील घडणाऱ्या घडामोडी व भारतीय अर्थव्यवस्थेचा संबंध लावून पाहिल्यास




केंद्र सरकार व आरबीआयने अनेक आर्थिक संकटांना तोंड देत यशस्वी मार्गक्रमणा केल्याची दिसते. कोरोना काळात अमेरिकेसारख्या महासत्तेला सुद्धा अर्थव्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी खिरापती सारखा डॉलर वाटावा लागला होता. त्याचे परिणामी तेथे भडकलेली महागाई अजूनही तेथील सेंट्रल बँकेला आवाक्यात आणता आलेली नाही. उलटपक्षी भारतीय रिझर्व बँकेने वेळोवेळी केलेल्या उपाययोजनांमुळे जगाच्या तुलनेत आतापर्यंत तरी महागाई आटोक्यात ठेवून परकीय गंगाजळीत आणि सोन्याच्या राखीव साठ्यात समाधानकारक वाढ होत आहे.

असे असले तरी जीएसटी कायद्याच्या अंमलबजावणीनंतर अर्थव्यवस्थेतील होणाऱ्या वाढीचा पुरेसा फायदा असंघटित क्षेत्रापर्यंत पूर्णपणे पोहोचू शकला नाही हे वास्तव आहे. मिश्र स्वरूपाची अर्थव्यवस्था असणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेत भांडवली गुंतवणूक करणारा भांडवलदार जितका महत्त्वाचा तितकाच किंबहुना अधिकच शेवटच्या बिंदूवरील कामगारही महत्त्वाचा आहे. लोकसभा निवडणुकीनंतर नवीन सरकार जून किंवा जुलै महिन्यात चालू आर्थिक वर्षाचा संपूर्ण अर्थसंकल्प सादर करेल. रिझर्व बँकेकडून मिळालेल्या अतिरिक्त लाभांशामुळे सरकारची वित्तीय तूट कमी होण्यास मदत मिळणार आहे. फीच , एस अँड पी, आणि मुडीज सारख्या जागतिक रेटिंग एजन्सी चे मानांकन सुधारून विदेशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष भांडवल वाढीस मदत मिळेल. याउलट मिळालेल्या जास्तीचा लाभांश सरकारी भांडवली खर्च (इन्फ्रा, रेल्वे एअरपोर्ट, बंदरे) वाढविल्यास त्याचा परिणाम प्रत्यक्ष रोजगार निर्मितीत लगेच दिसू शकेल. याच कारणाने भारतीय शेअर बाजाराने ही बाब सकारात्मक घेऊन प्रतिक्रिया दिली आहे. अर्थव्यवस्था आजारी असताना इंजेक्शन देण्यासाठीचा निधी जास्तीचा शिल्लक असल्यास अर्थव्यवस्था तंदुरुस्ती कडे वाटचाल करीत असताना टॉनिक म्हणून का वापरू नाही ?


**- राजेश देशपांडे**
**देशपांडे इन्व्हेस्टमेंट, अ.नगर**
**M.9850724890**


### भाजयुमोचे शहराध्यक्ष बोचुघोळ यांचा आरोप

## दुकानदार, अधिकाऱ्यांच्या संगनमताने रेशनच्या धान्याचा काळाबाजार

**समाचार/नगर-दि.२५**

शहरात जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात मोठ्या प्रमाणात रेशनधारकांना धान्याचे वाटप केले नसून, रेशनिंगच्या धान्यात दुकानदार व काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने मोठा काळा बाजार सुरु असल्याचा आरोप भाजप युवा मोर्चाचे शहराध्यक्ष मयुर बोचुघोळ यांनी केला आहे. या प्रकरणी तातडीने चौकशी करून दोषी अधिकारी व दुकानदार यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन बोचुघोळ यांनी अन्नधान्य वितरण अधिकारी यांना दिले आहे.



जानेवारी व फेब्रुवारी महिन्यांमध्ये धान्य वाटपाची टक्केवारी खूप कमी होती. या पुढील महिन्यात हे अचानक वाढून टक्केवारी मध्ये खूप मोठा बदल झालेला आहे. दोन महिन्यांमध्ये वाटप कमी झाले असून, अचानक एवढे लोक धान्य घेऊन का गेले नाहीत? याची चौकशी संबंधित अधिकाऱ्यांनी करण्याची गरज असल्याचे निवेदनात म्हंटले आहे. भाजप युवा मोर्चाच्या माध्यमातून सर्वसामान्य रेशनधारकांना त्यांचे धान्य वेळेवर व पूर्ण मिळाले पाहिजे, यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. याप्रकरणी अनेकवेळा जिल्हा प्रशासनाशी पाठपुरावा करुन देखील याप्रकरणी सुधारणा होत नसून, रेशनिंग धान्याच्या वाटपात मोठी अनागोंदी असल्याचे बोचुघोळ यांनी म्हंटले आहे. ज्या रेशनधारक ग्राहकांना दुकानदारांकडून धान्य मिळत नाही, अंत्योदय ग्राहकांना नियमाप्रमाणे लाभ मिळत नाही, धान्य दुकानदार पावती बिल देत नाही, रेशनकार्ड मध्ये नाव असून सुद्धा दुकानदार धान्य कमी देत असेल किंवा अपमानास्पद वागणुक देणे, फोन न उचलणे व नियमित दुकान न उघडणे अशा दुकानदार विरोधात तक्रार अर्ज ९३७३८८८८६९ या नंबरवर व्हॉट्सअप करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## रिक्षा चालकावरील हल्ल्याचा निषेध



**समाचार/नगर-दि.२५**

रिक्षा चालक गणेश आटोळे यांना मारहाण केल्याप्रकरणी आरोपी जावेद शेख व अय्याज शेख यांच्या वर जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांनी कठोर कारवाई करावी.तसेच लकी हॉटेल समोरील दोन रिक्षा चालकात वाद होऊन रिक्षा चालक गणेश आटोळे हा फॅक्चर झालेला असून संबंधितावर भा.कलम ३०७ गुन्हा दाखल करण्यात यावा.या मागणी चे निवेदन लोकराज्य ऑटो व टॅक्सी चालक मालक संघटनाच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक यांना देण्यात आले. याप्रसंगी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रामराजे शिंदे, जिल्हाध्यक्ष सिताराम खाकाळ, नगर शहर जिल्हा सरचिटणीस शंकर गोरे, जिल्हा कार्याध्यक्ष दिपक गुंजाळ, शहराध्यक्ष सुनिल ठाकरे ,सह. सरचिटणीस मच्छिंद्र शिंदे आदी उपस्थित होते. अशा प्रकारामुळे ॲटो संघटनेची चालक मालक संघटनेची बदनामी होत आहे.प्रवासी व स्थानिक नागरकित वेगळ्या दृष्टीने पाहत असून रिक्षात बसावे की नाही.प्रवाशांना हा संभ्रम निर्माण होत आहे.सदर घटना ही रिक्षा लावण्यावरून झालेली असून तेथे ट्राफिकचा एक पोलिस कर्मचारी कायमस्वरूपी नेमण्यात यावा. अशी मागणी संघटना करत आहे,असे निवेदनात म्हटले आहे.

### जितो स्पोर्ट्स नॅशनल गेमसाठी नगरचे खेळाडू रवाना

## नगरचे खेळाडू स्पर्धेत चमकदार कामगिरी करतील : मुथा

**समाचार/नगर-दि.२५**

बेंगळुरू येथील पदुकोण द्रविड संकुलात जितो स्पोर्ट्स नॅशनल गेम्सचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेत जितो अहमदनगरचा संघ सहभागी होणार असून नगरच्या खेळाडूंची टीम स्पर्धेसाठी रवाना झाली आहे. या स्पर्धेत मंथन मुनोत बॅडमिंटन १९ वर्षांखालील वयोगटात सिंगल व डबल मध्ये सहभागी होणार आहे. कुशल



नवलाखा, चिराग दुधेड्या, अंश चोरड्या, आगम बाफना, स्वयम लोढा, अनन्या बाफना हे खेळाडू टेबल टेनिस स्पर्धेत सहभागी होतील. खेळाडूंसमवेत स्पोर्ट्स कन्व्हेनर प्रनिल मुनोत, पालक स्मिता बाफना, प्रियंका नवलाखा रवाना झाले आहेत.

यावेळी खेळाडूंना शुभेच्छा देताना जितो अहमदनगरचे चेअरमन जवाहर मुथा म्हणाले, जितोच्यावतीने खेळाला नेहमीच विशेष पाठबळ देण्यात येते. अनेक राज्य, राष्ट्रीय स्पर्धांमध्ये जितो अहमदनगरच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली आहे. शिक्षणाबरोबरच खेळामुळे मुलांचा सर्वांगीण विकास होतो. हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून जितो कार्यरत आहे. बेंगळुरु येथील स्पर्धेत नगरचे खेळाडू ठसा उमटवतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सर्व खेळाडूंना जितो रेस्ट ऑफ महाराष्ट्राचे व्हा. चेअरमन गौतम मुनोत, सेक्रेटरी अमित मुथा, जितो अहमदनगर सेक्रेटरी आलोक मुनोत, लेडीज विंग चेअरमन मेघना मुनोत, युथ विंग चेअरमन गौतम मुथा, सेक्रेटरी खुशबू मुनोत व सदस्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.



## अय्यप्पा मंदिरात कलशाभिषेक उत्साहात

**समाचार/नगर-दि.२५**

आयप्पा मंदिराचा तीन दिवसीय ३० व्या वर्धापनदिन प्रतीस्थापना महोत्सवात आज कलशपूजा,कलशाभिषेक व नमस्कार मंडपाचे लोकार्पण करण्यात आले आहे.अशी माहिती अध्यक्ष के के शेट्टी यांनी दिली वर्षभर होणारी देवाच्या मूर्तीची होणारी जीर्णता काढून त्यामध्ये चैतन्य निर्माण होण्यासाठी आयुर्वेदिक वस्तूंचा वापर करून मंत्रोपचारात देवांना त्या पाण्याने अभिषेक केला जातो,त्यामुळे मूर्ती मध्ये चैत्यन्य निर्माण होते यासाठी कलशपूजा करून कलशाभिषेक झाला. अय्यप्पा स्वामी ,गणपती व सरस्वतीचे ३ मुख्य कलश तसेच अय्यप्पा स्वामीचे १०८ कलश,गणपतीचे २४ कलश,सरस्वतीचे २४ कलश पूजन करण्यात आले व त्यातील आयुर्वेदिक पाण्याने मंत्रोपचारात तीनही मूर्तींना अभिषेक करण्यात आला. एका भाविकाने दिलेल्या देणगीतून नवीन नमस्कार मंडप उभारण्यात आले. त्याचे पूजन करून देवाचे वाहन घोडा ची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली व त्याचे लोकार्पण करण्यात आले,हा दर्शन मंडप मंदिराप्रमाणेच बांधण्यात आला असून तोही आकर्षक आहे वार्षिक वर्धापन दिनानिमीत आज तिसऱ्या दिवशी पहाटेपासूनच विविध धार्मिक कार्यक्रम सुरु झाले सकाळी गणपती होमम,उषापूजा,अष्टबंधम चारथाळ,कलशाभिषेकम्,वाहन प्रतिष्ठा आणि नमस्कार मंडप समर्पण,कुंभभिषेक,उंच पूजा विधी संपन्न झाले.

## पान १ वरुन

### कारवाईची धमक दाखविणार का?

चोपडा यांनी यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांना पत्र पाठविले आहे. पत्रात पुढे म्हंटले आहे की, बँकेत गैरव्यवहार झाला त्यावेळी भाजपाचे दिवंगत खासदार दिलीप गांधी हे अध्यक्ष होते. त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचा देखील फॉरेन्सिक ऑडिटच्या अहवालात समावेश आहे. इतरही काही सहकारी संस्थांमधील गैरप्रकारात त्यांचे नाव येत आहे. असे असताना केवळ भाजपाचे नेते असल्याने सरकारकडून कारवाई करण्यासाठी टाळाटाळ होते आहे का? मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी नगरमधील ठेवीदारांचा जनक्षोभ तातडीने विचारात घेऊन दोषींवर कडक कारवाईचे आदेश देण्याची मागणी चोपडा यांनी पत्राद्वारे केली आहे.

### हस्तांतरण करण्याच्या आदेशाला स्थगिती

जीवन प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंत्यांनी झाडे तोडण्यासाठी पोलिस अधीक्षकांकडे संरक्षण मागितले. दरम्यान, शिरसुले येथील गायरान जमीन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याचा अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश रद्द करावा, झाडे तोडण्यासाठी संरक्षण देण्यापासून पोलिस अधीक्षकांना रोखावे अशा मागण्या करणारी याचिका शिरसुले ग्रामस्थांच्यावतीने दिगंबर घोगरे यांनी औरंगाबाद खंडपीठात केली. सदर याचिका २२ मे रोजी दाखल करून घेताना उच्च न्यायालयाचे सुटी कालीन न्यायाधीश संजय देशमुख यांनी याचिकाकर्त्यांच्या मागण्या तात्पुरत्या स्वरूपात मान्य केल्या आहेत. त्यामुळे शिरसुले गायरानातील ८२० झाडांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे. शिरसुले ग्रामस्थांच्यावतीने स्वप्नील मुळे यांनी तर सरकारच्यावतीने वकील नेहा कांबळे यांनी काम पाहिले.

### केवायसी कागदपत्रे १८ जून पूर्वी सादर करा

सदर कागदपत्रे मुदतीत जमा न केल्यास खात्यातील रकमेचा दावा घेण्यास संबंधित खातेदार इच्छुक नसल्याचे व भविष्यात त्यावर दावा करणार नसल्याचे समजण्यात येईल. तसेच बँकेच्या सर्व थकीत कर्जदार व जामीनदारांनीही आपापल्या कर्ज खात्यावरील थकबाकी रक्कम लवकरात लवकर भरून बँक प्रशासनास सहकार्य करावे व संभाव्य कायदेशीर कारवाई टाळावी, असे आवाहन बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी केले आहे.

### सोनसाखळी चोरी करणारे दोघे जेरबंद

ताब्यात घेण्यात आलेले आरोपी नामे सलीम ऊर्फ सलीमोद्दीन अजोलोद्दीन शेख वय ५४, जिशान सलीम ऊर्फ सलीमोद्दीन शेख वय २१ यांचेकडून १,७५,०००/- रुपये किमतीचे २५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहे. सदरची कारवाई राकेश ओला, पोलिस अधीक्षक, अहमदनगर, प्रशांत खैरे, अपर पोलिस अधीक्षक व अमोल भारती, उपविभागीय पोलिस अधिकारी, नगर शहर विभाग यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस अधिकारी व अंमलदार यांनी केलेली आहे.

## कपाशीसाठी ठराविक वाणाचा आग्रह न धरण्याचे आवाहन

**समाचार/नगर-दि.२५**

खरीप हंगाम सुरु झालेला असुन बाजारामध्ये शेतकऱ्यांची बि-बियाणे, खते व इतर कृषि निविष्ठा खरेदीसाठी लगबग सुरु झालेली आहे. बाजारामध्ये कपाशी पिकाचे विविध कंपन्यांचे अनेक उत्कृष्ठ वाण उपलब्ध आहेत. सर्वच वाण हे उत्पन्नासाठी चांगले असुन आपल्या स्थानिक परीस्थितीनुसार चांगला वाण निवडुन शेतकऱ्यांनी लागवड करावी. त्यासाठी शेतकरी बांधवांनी ठराविक वाणांचा आग्रह न धरता इतर पर्यायी वाणांची लागवड करावी व योग्य पाऊस झाल्याशिवाय लागवड करु नये. असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले.

या वर्षी जिल्हयामध्ये १,४८,४३० हेक्टर क्षेत्रावर कपाशीची लागवड होणे अपेक्षित आहे. जिल्हयामध्ये विविध कंपन्यांचे मिळून २,४९,८३५ पाकीटे उपलब्ध असुन दररोज उपलब्धता वाढत आहे. कपाशी बियाणे खरेदी करताना शेतकरी काही ठराविक कंपन्यांच्या ठराविक वाणांचीच जास्त प्रमाणात मागणी करत आहेत तथापि राज्यातील कृषि विद्यापीठे व राष्ट्रीय पातळीवरील कृषि संशोधन संस्था यांनी अनेक सरस वाणांच्या लागवडीची शिफारस केली आहे. त्यानुसार शेतकऱ्यांनी कपाशीची लागवड करावी लागवडी बाबत शेतकऱ्यांनी कृषि विभागाच्या क्षेत्रीय कर्मचारी व तालुका कृषि अधिकारी कार्यालयात संपर्क करण्याचे आवाहन कृषि विभागामार्फत ( गुणनियंत्रण योजना) करण्यात आले आहे.

### रिक्षा व टॅक्सी चालक - मालक संघटनेचे निवेदन

## दररोज ५० रुपयांच्या दंडाची अट शिथील करावी-घुले

**समाचार/नगर-दि.२५**

अहमदनगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक मालक संघटनेच्यावतीने रिक्षा तंदुरुस्ती प्रमाणपत्रासाठी लागणारा दंड स्थगित करण्यात यावा, या मागणीचे निवेदन निवासी जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष अविनाश घुले, कार्याध्यक्ष विलास कराळे, उपाध्यक्ष दत्ता वामन, गणेश आटोळे, नासिर खान, सुधाकर साळवे आदिंसह पदाधिकारी उपस्थित होते.



अविनाश घुले म्हणाले, शासनाच्या नियमाप्रमाणे रिक्षाला दरवर्षी तंदुरुस्ती / योग्यता प्रमाणपत्र घ्यावे लागते. त्यासाठी विमा, विविध प्रकारची फी, गाडी दुरुस्ती इत्यादी खर्च कसाबसा करावा लागतो. त्यामुळे तंदुरुस्ती प्रमाणपत्र घेणे मागे/पुढे होते, परंतु शासनाने दर दिवसाला ५० रुपये दंडाची पठाणी वसुली करत आहे. हा दंड अन्यायकारक आहे. मोठ-मोठ्या शहरात रिक्षा चालकांचे दर आणि छोटे शहर, ग्रामीण भागातील रिक्षा भाडे यात मोठी तफवत असते. त्यामुळे सरसकट सर्वांना एकाच नियमाने दंड आकारणे योग्य नाही. रिक्षा चालक कसेतरी करुन रिक्षाच्या माध्यमातून आपला उदरनिर्वाह चालवत आहेत. तंदुरुस्ती प्रमाणपत्र घेण्यास उशिर झाल्याने एवढा मोठा दंड भरणे अवघड होत आहे. तरी या दिवसाला ५० रुपये दंडाची अट शिथिल करावी.

यावेळी जुनेद बागवान, सय्यद कयुम, सुलेमान शेख, शेख अस्लम, शेख अन्वर, राकेश शिंदे, इरफान पठाण, सलमान शेख, गोरख शिंदे, मारुती लोखंडे, गणेश धनगर, गोरख आंबेकर, रामदास शिंदे, फारुक शेख, अर्शद सय्यद, याकुब शेख, समीर सय्यद, साजिद सय्यद, शेख साजिद, युसूफ शेख, विजय उमाप आदि उपस्थित होते.


**समाचार**

**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# हवामानबदलामुळे रोगराईमध्ये वाढ





**माणूस ज्या प्रकारे पृथ्वीचे शोषण करत आहे, त्याच प्रमाणात स्वतःच्या विनाशाचा मार्ग तयार करत आहे. मानवामुळे होणारे प्रदूषण, हवामानातील बदल, जैवविविधतेचे नुकसान, परकीय प्रजातींचे आक्रमण आणि अधिवासांचे नुकसान यामुळे पृथ्वी मानवासह अनेक जीवांसाठी निर्जन बनली आहे. त्यामुळे अनेक संसर्गजन्य आजार झपाट्याने पसरत आहेत. ते मनवाप्रमाणेच प्राणी आणि वनस्पतींनाही धोका निर्माण करत आहेत.**

पर्यावरण

**मिलिंद बेंडाळे**

पर्यावरण अभ्यासक

जलवायू परिवर्तनाचा परिणाम सखोलपणे समजून घेण्यासाठी नॉट्रेडेम विद्यापीठातील संशोधकांच्या नेतृत्वाखाली एक नवीन अभ्यास केला गेला. त्याचे परिणाम 'नेचर' या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहेत. शास्त्रज्ञांनी याआधी काही रोगांच्या वाढत्या प्रकरणांवर आणि पर्यावरणातील बदलांवर लक्ष केंद्रित केले आहे. त्यात मलेरियासारख्या आजारांचा समावेश आहे. मलेरिया पसरवण्यात हवामानबदलाची मोठी भूमिका आहे. जागतिक आरोग्य संघटनेनेदेखील त्याला दुजोरा दिला आहे. डास उष्ण आणि कोरड्या हवामानात वाढतात. दुसरीकडे, त्यांचा नैसर्गिक अधिवास नष्ट झाल्यामुळे हे रोगकारक जीव मानवी वस्तीच्या जवळ येत आहेत. परिणामी या रोगांचा धोका वाढतो आहे. मलेरियाच्या बाबतीत अशी अनेक उदाहरणे आहेत, जिथे यापूर्वी कधीही मलेरिया या रोगाचा धोका दिसला नव्हता. अशा अनेक ठिकाणी या रोगाचा धोका पसरत आहे. वन्य जीव विविधतेत घट झाल्यामुळे उत्तर अमेरिकेत लाइम रोगाची प्रकरणे वाढू शकतात. नॉट्रेडेम विद्यापीठाशी निगडित संशोधकांच्या नेतृत्वाखालील अभ्यासकांनी हवामान आणि पर्यावरणावरील वाढत्या मानवी प्रभावामुळे गुंतागुंतीच्या समस्या कशा निर्माण होत आहेत, याचा सखोल अभ्यास केला आहे. अभ्यासाशी संबंधित संशोधकांनी लिहिले की आम्हाला माहीत आहे की संसर्गजन्य रोग वाढत आहेत आणि मानव वातावरणात व्यापक बदल करत आहेत. संसर्गजन्य रोगांचा परिणाम केवळ मानवावरच नाही तर इतर प्राणी आणि वनस्पतींवरही होत आहे.

या अभ्यासात, संशोधकांनी जागतिक बदलांना संसर्गजन्य रोग कसा प्रतिसाद देतात हे समजून घेण्यासाठी आठ वेगवेगळ्या भाषांमधील ९७२ पूर्व–अस्तित्वातील अभ्यासातून २,९३८ निरीक्षणांचे विश्लेषण केले. त्यात वनस्पती, प्राणी आणि मानवांवर परिणाम करणारे यजमान आणि परजीवी यांचे १,४९७ संयोजन समाविष्ट होते. त्यांच्या विश्लेषणात शास्त्रज्ञांनी पाच घटकांवर लक्ष केंद्रित केले आहे, जे जगभरातील पर्यावरणात मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणत आहेत. यामध्ये जैवविविधतेचे नुकसान, हवामानबदल, रासायनिक प्रदूषण, परकीय प्रजातींचा प्रसार, नैसर्गिक अधिवासातील बदल आणि नुकसान यांचा समावेश आहे. या अभ्यासात हवामानबदलामुळे वाढणारे तापमान, सरासरी तापमान आणि पावसात होणारे बदल यांचा समावेश आहे. याशिवाय, नैसर्गिक अधिवासांना झालेल्या हानीमध्ये जंगलांचे तुकडे होणे, शहरीकरण आदींच्या अभ्यासानंतर शास्त्रज्ञ या निष्कर्षापर्यंत पोहोचले आहेत की संसर्गजन्य रोग पसरण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे जैवविविधता नष्ट होणे. त्यामुळे या आजारांचा प्रसार वेगाने होत आहे. नवीन परदेशी प्रजातींचा उदय, हवामानातील बदल आणि रासायनिक प्रदूषण ही जगातील संसर्गजन्य रोगांच्या प्रसाराची सर्वात मोठी कारणे मानली जातात. संशोधनानुसार या बदलांमुळे काही रोग पसरण्याच्या अधिक संधी निर्माण होत आहेतच; पण त्यांच्या प्रसाराच्या पद्धतीही बदलत आहेत. मानव आणि इतर सजीवांमध्ये संसर्गजन्य रोगांच्या वाढत्या प्रसारामुळे रोगांचा धोका वाढत आहे. याशिवाय झाडे आणि पिकांवरील रोगांचे प्रमाण वाढल्याने शेती, अन्नसुरक्षा आणि जैवविविधतेला धोका निर्माण होत आहे.

या अभ्यासाशी संबंधित संशोधक जेसन रोहर यांनी म्हटले आहे की पर्यावरणात झालेल्या अनेक बदलांमुळे प्राणी आणि मानवांमध्ये परजीवी वाढतात. याचा अर्थ असा की या बदलांमुळे प्राण्यांपासून मानवांमध्ये अधिक रोग पसरू शकतात. तसेच, या कारणांमुळे साथीचा धोका वाढू शकतो. शास्त्रज्ञांनी संशोधनात म्हटले आहे की भविष्यात रोगांचे परिणाम अधिक व्यापक होतील. त्यामुळे वाढते उत्सर्जन कमी करण्याची तातडीची गरज अधोरेखित होत आहे. संशोधकांच्या म्हणण्यानुसार, हवामानातील बदलामुळे आणि तापमानवाढीमुळे रोग पसरवणाऱ्या जीवांसाठी अधिक अनुकूल वातावरण निर्माण होत आहे. शिवाय यामुळे त्यांचा प्रजनन कालावधीही वाढत आहे.

अशा परिस्थितीत या परजीवींच्या वाढीमुळे रोगांचा प्रसार होण्याचा धोकाही वाढत आहे. त्याचप्रमाणे रासायनिक प्रदूषणामुळे जीवांच्या रोगप्रतिकारक शक्तीवर दबाव येतो. हवामानबदल प्राण्यांच्या हालचाली आणि निवासस्थानात बदल करू शकतो आणि त्यांच्या नवीन प्रजाती समोर आणू शकतात. जे रोगजनकांच्या प्रसारासाठी उपयुक्त ठरू शकतात. तथापि, मानव पृथ्वीत करीत असलेले घटक केवळ संसर्गजन्य रोग वाढवत नाहीत, तर कमीदेखील करू शकतात.

या अभ्यासातून समोर आलेली सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे नैसर्गिक अधिवास नष्ट करणे किंवा त्यांच्यात होणारे बदल संसर्गजन्य रोगांचा धोका कमी करू शकतात. तथापि, जंगलतोडीमुळे रोगराई वाढू शकते, ही कल्पना या अभ्यासातून नाकारता येत नाही. तथापि, त्याऐवजी, काही परिस्थितींमध्ये धोका वाढू शकतो आणि इतरांमध्ये अधिवास आणि जंगलाचा नाश झाल्यामुळे कमी होऊ शकतो. जंगलांचा नाश मलेरियापासून इबोलापर्यंतच्या रोगांचा धोका वाढवू शकतो. या नवीन अभ्यासानुसार, शहरीकरण होत आहे, तसतसे स्वच्छता, पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थाही सुधारत आहे. त्यामुळे संसर्गजन्य रोगांचे प्रमाण कमी होत आहे. अशा स्थितीत, जागतिक बदल परतवणे त्यांचे वाढणारे दुष्परिणाम दूर करण्यासाठी पुरेसे ठरेल का, हा मोठा प्रश्न आहे. संसर्गजन्य रोगांचे व्यवस्थापन करण्यासाठी मर्यादित संसाधनांसह जागतिक बदलांवर लक्ष केंद्रित करणे महत्वाचे आहे. संशोधकांनी याला सामोरे जाण्याचे मार्ग ठळक केले. उत्सर्जन कमी करणे, परिसंस्थेचे संरक्षण करणे आणि जैविक आक्रमणांना प्रतिबंध करणे, तसेच जैवविविधतेचे नुकसान, वनस्पती, प्राणी आणि मानवांना रोगांचे ओझे कमी करण्यास मदत करू शकते. चांगल्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीची सांगड घातली तर ते आणखी प्रभावी होईल. मानवी क्रियाकलापांमुळे वाढते प्रदूषण, हवामानबदलामुळे जैवविविधता आणि पर्यावरणाची हानी, परकीय प्रजातींचे आक्रमण आणि अधिवासांचे नुकसान यामुळे अनेक संसर्गजन्य रोग वेगाने पसरत आहेत. हे रोग केवळ मानवांसाठीच नाही तर इतर प्राणी आणि वनस्पतींनाही धोका निर्माण करत आहेत.

हवामानबदलामुळे वाढते तापमान, सरासरी तापमान आणि पावसाच्या पद्धतीत होणारे बदल यांचाही या अभ्यासात समावेश होता. पर्यावरणात झालेल्या अनेक बदलांमुळे प्राणी आणि मानवांमध्ये परजीवी वाढतात. याचा अर्थ असा की या बदलांमुळे प्राण्यांपासून मानवांमध्ये अधिक रोग पसरू शकतात. तसेच या कारणांमुळे साथीचा धोका वाढू शकतो. पाणी डोक्यावरून जाण्यापूर्वी आपण सावधगिरी बाळगली पाहिजे. भारतातही हवामानातील बदल, विशेषत: तापमान आणि आर्द्रतेतील बदल, काही भागात अतिवृष्टी आणि काही भागात दुष्काळामुळे संसर्गजन्य रोगांचा प्रसार वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. भारतातील अनेक भागांमध्ये एच२ एन ३, एडेनोव्हायरस आणि स्वाइन फ्लूसह श्वसन संक्रमणांमध्ये अलीकडे वाढ झाल्याने चिंता वाढली आहे; मात्र या सगळ्यासाठी हवामानबदलाला जबाबदार धरणे घाईचे होईल. वातावरणातील बदलामुळे डेंगी, चिकुनगुनिया, मलेरिया या आजारांचा प्रादुर्भाव वाढला आहे.

सतत वाढत जाणारे तापमान विषाणूंच्या प्रसाराच्या पद्धतीवर परिणाम करते आणि रोग पसरवणाऱ्यांवरही अनेक प्रकारे परिणाम करते. बदलती हवामान परिस्थिती विषाणूंच्या क्षमतेला आणि त्यांच्यामुळे पसरणाऱ्या रोगांना अधिक अनुकूल बनवते. उबदार आणि दमट परिस्थिती रोग पसरवण्याचे मार्ग, रोगाची वारंवारता आणि तीव्रता या दोन्हींवर परिणाम करू शकतात. हवामानातील बदलांमुळे प्रजातींच्या निवासस्थानात बदल होतो. काही प्रजाती नवीन विषाणूंना अधिक संवेदनक्षम बनवू शकतात. त्यामुळे त्यांची लोकांमध्ये पसरण्याची क्षमता वाढू शकते. उदाहरणार्थ, देशाच्या कोरड्या भागात अतिवृष्टी आणि पूर यामुळे रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. सामान्यत: हे ओल्या भागात होत असते. यामुळे कॉलरा आणि आमांश यासारखे जलजन्य रोग तसेच मलेरिया, डेंगी आणि चिकनगुनियासारखे रोग वाढतात, असा या संशोधकांचा निष्कर्ष आहे.

# भारतीय फूटबॉलचा आधारस्तंभ

लक्षवेधी

**सायली शिगवण**



**बंगळुरू एफसी आणि भारतीय राष्ट्रीय संघासाठी स्ट्राइकर म्हणून खेळणारा सुनिल छेत्री 'कॅप्टन फेंटॅस्टीक' म्हणूनही ओळखला जातो. देशातील तमाम फुटबॉलपटूंसाठी आदर्श ठरलेला हा खेळाडू लवकरच कारकिर्दीतला शेवटचा सामना खेळणार आहे. ३९ वर्षीय सुनिल भारतीय फुटबॉल संघाचा एक महत्त्वाचा भाग राहिला. फुटबॉलपटू म्हणून निवृत्ती जाहीर करणाऱ्या या अव्वल खेळाडूच्या कारकिर्दीचा हा मागोवा.**

जगात भारतीय फूटबॉल संघाचा वरचष्मा असा निर्माण झाला नाही. या खेळात देशाने अव्वल स्थान मिळवले आहे, असेही झाले नाही. क्रिकेट, बॅडमिंटन, टेनिस आदी खेळांना मिळणारे वलय भारतीय फूटबॉलला कधीच मिळाले नाही. आपल्याकडे फूटबॉलबद्दल भरपूर आवड असलेले अनेकजण आढळतील, रात्र–रात्र जागून किंवा एखाद्या सार्वजनिक ठिकाणी स्पर्धेचा जोश अनुभवणारेही सापडतील, मात्र आवर्जून फूटबॉल खेळणारे आणि देशाला या खेळामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर नेणारे खेळाडू तसे विरळच. मात्र तरीही बायचुंग भुतिया किंवा सुनिल छेत्रीसारखे खेळाडू या खेळात आपला ठसा उमटवतात. जागतिक पातळीवर दखल घेतली जावी अशी कामगिरी ते करतात. त्यांचे नाव सतत कानावर पडत राहते, त्यांच्या कामगिरीची दखल अवघे क्रिडाविश्व घेत असल्याचेही पहायला मिळत राहते, मात्र देशात एका मर्यादेपर्यंतच या खेळाचा प्रसार असल्याने उत्कृष्ट कामगिरी करुनही हे खेळाडू गळयातला ताईत वगैरे बनत नाहीत किंवा प्रचंड लोकप्रिय होत नाहीत. अर्थात त्यामुळे त्यांच्या खेळीचे महत्व कमी होत नाही.

माजी कर्णधार आणि अनुभवी स्ट्रायकर बायचुंग भूतियाच्या निवृत्तीनंतर, सुनील छेत्रीने टीम इंडियाची जबाबदारीही घेतली आणि एकट्याने भारतीय संघाला अनेक सामन्यांमध्ये विजय मिळवून दिला. २००५ मध्ये फुटबॉल क्षेत्रामध्ये पदार्पण करणाऱ्या सुनीलने ६ जूनला होणाऱ्या कोलकतामधील सॉल्ट लेक स्टेडियमवर कुवेत विरुद्ध भारताच्या दुसऱ्या फेरीतील विश्वचषक पात्रता सामन्यामध्ये शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळणार असल्याची घोषणा केली. बंगळुरु एफसी आणि भारतीय राष्ट्रीय संघासाठी स्ट्राइकर म्हणून खेळणारा छेत्री 'कॅप्टन फेंटॅस्टीक' म्हणूनही ओळखला जातो. देशातील तमाम फुटबॉलपटूंसाठी आदर्श ठरलेल्या या खेळाडूचा हा शेवटचा सामना असणार आहे. हा ३९ वर्षीय खेळाडू भारतीय फुटबॉल संघाचा एक महत्त्वाचा भाग राहिला. त्याने आतापर्यंत देशासाठी १५० सामन्यांमध्ये ९४ गोल केले असून सर्वोत्कृष्ट फुटबॉलपटू म्हणून तो सध्या चौथ्या स्थानावर आहे. नुकतीच त्याने फुटबॉल कारकीर्दीमधून निवृत्ती जाहीर केली. देशासाठी सर्वाधिक गोल–करणारा अशी ओळख असलेल्या छेत्रीचे संघामध्ये नसणे संघाला जाणवणार आहे, कारण कारकीर्दीच्या शेवटच्या टप्प्यातही संघ त्याच्याच कामगिरीवर अवलंबून आहे, असे दिसते. भारतीय फुटबॉलच्या भविष्यावर बोलताना तो म्हणतो, आता देशावर नवव्या क्रमांकाचा खेळाडू शोधण्याची वेळ आली आहे. सध्या संघामधला एकही खेळाडू मु'य स्ट्रायकर म्हणून खेळत नाही, हे इथे लक्षात घ्यायला हवे.

छेत्रीने २०११ मध्ये एफसी आशियाई चषक स्पर्धेत भाग घेतला होता आणि २०१२ चॅलेंज कप पात्रता स्पर्धेत त्याची राष्ट्रीय संघाचा कर्णधार म्हणून निवड झाली. त्याच्या नेतृत्वाखाली २००८ मध्ये भारताने चॅलेंज कप जिंकला. छेत्रीने २०११, २०१५, २०२१ आणि २०२३ मध्ये सॅफ चॅम्पियनशिप स्पर्धेचे विजेतेपद जिंकून दक्षिण आशियाई फुटबॉलमध्ये भारताला प्रबळ शक्ती म्हणून स्थापित करण्यात मदत केली. तसेच भारताने २००७, २००९ आणि २०१२ असा तीन वेळा नेहरु चषक जिंकला. छेत्री २०१८ आणि २०२३ मध्ये भारताच्या इंटरकॉन्टिनेंटल चषकाचाही एक भाग होता. सक्रिय फुटबॉलपटूंमध्ये ख्रिस्तियानो रोनाल्डो आणि लिओनेल मेस्सी यांच्या बरोबरीने सुनील छेत्रीचेही नाव घेतले जाते. आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये सर्वाधिक गोल करणारा सुनील छेत्री हा दुसरा आशियाई खेळाडू आहे. या बाबतीत इराणचा अली दाई पहिल्या क्रमांकावर आहे. कर्णधारपदी असताना बजावलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे छेत्रीला भारत सरकारकडून दोनदा सन्मानित करण्यात आले. २०११ मध्ये त्याला पहिल्यांदा अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्यानंतर २०२१ मध्ये 'खेलरत्न' हा देशातील सर्वात मोठा क्रिडा सन्मान पुरस्कारही त्याला मिळाला. छेत्रीने २००७, २०११, २०१३, २०१४, २०१७, २०१८–१९ आणि २०२१–२२ या हंगामांमध्ये एकूण सात वेळा प्रतिष्ठित ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशनचा 'प्लेयर ऑफ द इयर' हा किताब जिंकला. तसेच २००९, २०१८ आणि २०१९ मध्ये एफपीआय इंडियन प्लेयर ऑफ द इयर पुरस्कार देखील जिंकला.

मैदानामध्ये प्रतिस्पर्ध्यांना नामोहरम करणाऱ्या कुशल चाली रचणे हे सुनील छेत्रीचे वैशिष्ट्य आहे. त्याचबरोबर त्याचा फिटनेस अनेक खेळाडूंना प्रेरणा देणारा आहे. त्याने नेहमीच फिटनेसकडे लक्ष दिले. कोणत्याही खेळाडूला यशस्वी होण्यासाठी फिटनेस आणि डाएटची शिस्त पाळणे आवश्यक असते, हे त्याने सोदाहरण दाखवून दिले.

आपल्या दोन दशकांच्या कारकिर्दीमध्ये छेत्रीने ३६५ क्लब सामन्यांमध्ये १५८ गोल केले. त्याने कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या पाकिस्तानविरुद्ध जून २००५ मध्ये भारतातर्फे पदार्पण केले आणि पहिल्याच सामन्यात गोल डागला. देशासाठी पहिला सामना खेळण्याच्या आधीचे काही क्षण खूप महत्त्वपूर्ण असतात. तो अनुभव सांगताना सुनील म्हणतो, सामन्याच्या दिवशी सकाळी भारतीय संघाचे पहिले प्रशिक्षक घरी आले आणि ते म्हणाले, या सामन्यात तू खेळणार आहेस. हे ऐकताच तो काहीही विचार न करता जर्सी घालून, परफ्यूम स्प्रे करून निघाला. पदार्पणाच्या सामन्यात ८० व्या मिनिटाला पहिला गोल करण्यापर्यंतचा दिवस तो कदाचित कधीच विसरणार नाही. हा त्याच्या संघाच्या प्रवासातील सर्वोत्तम दिवस. एकीकडे खेळताना असलेला दबाव आणि दुसरीकडे गोल झाल्यानंतर किंवा सामना जिंकल्यानंतर झालेला प्रचंड आनंद यांच्यामध्ये एक अतिशय सुंदर संगम आहे, असे तो सांगतो. त्याने कधीही स्वत:पुरता विचार केला नाही. कायम खेळाचा दर्जा राखण्याचा त्याचा प्रयत्न असायचा. निवृती घेण्याच्या विचारात असताना आतापर्यंतचा जीवनपट त्याच्या डोळ्यांसमोर तरळत होता. प्रत्येक सामना, त्याला आवश्यक प्रशिक्षण देणारे वेगवेगळे प्रशिक्षक, संघ, मैदान, खेळताना झालेल्या चुका या सर्व गोष्टी त्याला आठवू लागल्या.

'माझं मन म्हणतंय मी योग्य निर्णय घेतला आहे, पण माझ्या आतला खेळाडू देशासाठी खेळण्याची एक शेवटची संधी नाकारू शकत नाही.' असेही तो म्हणतो. इथून पुढे राष्ट्रीय संघासोबत घेतलेल्या प्रशिक्षणाचा, शेवटच्या सामन्याचा आनंद त्याला घ्यायचा आहे. त्याच्या कारकिर्दीतला शेवटचा ठरणारा कुवेतविरुद्धचा सामना सोपा नसणार आहे. परंतु, त्याने दडपण घेतलेले नाही. विश्वचषकाच्या तिसऱ्या फेरीसाठी पात्र होण्यासाठी देशाला तीन गुणांची आवश्यकता आहे. भारतीय संघासाठी हे खूप महत्त्वाचे आहे. त्यामुळे हा शेवटचा सामना छेत्री पूर्ण ताकदीनिशी खेळेल, अशी खात्री चाहत्यांना वाटते. चाहत्यांकडून उदंड प्रेम, आपुलकी आणि कौतुक मिळवणारा फुटबॉलपटू मीच असेन, असेही तो म्हणतो. त्याच्या निवृत्तीनंतर संघातील इतर खेळाडू त्यांची कामगिरी चोख बजावतील. प्रत्येक खेळाडू काही तरी प्रेरणा घेऊनच मैदानावर १०० टक्के योगदान देण्याचा प्रयत्न करत असतो. ती प्रेरणा कधी एखादी व्यक्ती असू शकते किंवा एखादी घटना. सुनीलला फुटबॉल खेळण्याची प्रेरणा देणारी व्यक्ती म्हणजे त्याची आई. सुशीला छेत्री याही एक प्रसिद्ध फुटबॉलपटू होत्या. नेपाळच्या फुटबॉल संघाकडून त्या खेळल्या आहेत. वडील सैन्यदलात असल्यामुळे सतत बदली होत असे. त्यामुळे तो अनेक शाळांमध्ये शिकला. असे असले तरी त्याने फुटबॉलची साथ कधीच सोडली नाही. त्याच बरोबरीने त्याच्या आईनेही त्याला मोलाची साथ दिली. सुनील आणि त्याची बहिण बंदना या दोघांनाही फुटबॉलची गोडी लागली. पण खेळाबरोबर अभ्यासही तितकाच महत्त्वाचा असल्यामुळे खेळ आणि अभ्यास शिस्तीत आणि ठरलेल्या वेळीच व्हावा, अशी आईची इच्छा होती. सुनिल छेत्री सांगतो, माझी आईच माझी पहिली कोच आणि पहिली प्रतिस्पर्धी होती. आईला हरलेले अजिबात आवडायचे नाही. त्यामुळे सतत लढण्याचा आणि विजयाला गवसणी घालण्याचा गुण सुनीलमध्ये आईकडूनच आला आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. २०२२ च्या एशिया कप स्पर्धेत त्याने महिला फुटबॉल संघाला प्रशिक्षण दिले. भारतीय क्रिकेट संघाचा फलंदाज विराट कोहलीने सुनील छेत्रीच्या पोस्टवर कमेंट करून 'माझ्या भावा, आम्हाला तुझा अभिमान आहे' असे म्हटले तर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) ट्विट केले की तुमची कारकीर्द असामान्यपेक्षा कमी नाही आणि तुम्ही भारतीय फुटबॉल आणि भारतीय खेळांसाठी एक अभूतपूर्व आयकॉन आहात.

पान ४ वरुन

# चाबहार अमेरिकेला का चावतोय?

हिताचा आहे. आपले धोरणात्मक हीतही याच्याशी जोडलेले आहे. असे असताना शाहीद बेहेश्ती पोर्ट–चाबहार करारानंतर अमेरिकेने भारताला इशारा दिला. इराणला सहकार्य करणाऱ्यांनी अमेरिकेने त्या देशावर लादलेल्या निर्बंधांची आठवण ठेवावी, असे सूचित करणारा हा गर्भित इशारा आहे. खरे तर २०१६ मध्ये भारत आणि इराण यांच्यामध्ये अमेरिकी निर्बंधांना न जुमानता चाबहार बंदराचा करार झाला होता. त्या वेळी अमेरिकेने जाहीर केले होते की चाबहारच्या विकासासाठी भारताचे सहकार्य निर्बंधांच्या कक्षेबाहेर राहील. भारत आणि अमेरिकेची मैत्री आहे तसेच दक्षिण आशियात चीनला शह देण्यासाठी अमेरिकेला भारताची गरज आहे. असे असले तरी भारत अमेरिकेच्या ओंजळीने पाणी पित नाही. आपले स्वतंत्र धोरण आहे. आपण अन्य देशांशी कसे आणि किती संबंध ठेवावेत, या विषयात अमेरिकेने लुडबूड करण्याचे काहीच कारण नाही. भारताने रशियाकडून एस–४०० क्षेपणास्त्र घेतली, तेव्हाही अमेरिकेने परिणामांचा इशारा दिला होताच. मात्र आता भारत अशा फुकाच्या धमक्यांना भीक घालत नाही, हे अमेरिकेला कळायला हवे होते. निर्बंध असतानाही भारतासह जगातील अनेक देशांनी रशियातून कच्चे तेल खरेदी केले आहेच. अजूनही ही खरेदी सुरूच आहे.

असे असले तरी अमेरिकेची नाक खुपसण्याची सवय काही जात नाही. अमेरिकेच्या प्रवक्त्यांच्या वक्तव्यात कठोरपणा नसल्यामुळे कदाचित भारत आणि अमेरिकेदरम्यान या मुद्द्यावर पडद्याआड चर्चा झाली असण्याचीही शक्यता आहे. देशांतर्गत दबावामुळे आणि या वर्षी पार पडत असणाऱ्या अध्यक्षीय निवडणुकीमुळे अमेरिकेने हे विधान केले असण्याचीही शक्यता आहे. त्यामुळे ही बाबही लक्षात घ्यायला हवी. अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन प्रशासनाने इराणबाबत अतिशय कठोर भूमिका घेतली आहे. इराण हा पश्चिम आशियातील मोठा देश आहे. इराणचे भारतासोबतचे राजकीय संबंध, विशेषत: ऊर्जा क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्य दोन्ही देशांसाठी फायदेशीर ठरले आहेत. तथापि, हेदेखील सत्य आहे की अमेरिकेच्या निर्बंधांमुळे अनेक भारतीय कंपन्यांनी इराणपासून अंतर राखले होते. कंपन्यांनी तिथे गुंतवणूक करणे टाळलेले होतेच पण इराणी कंपन्यांशी भागीदारी करण्यासदेखील कंपन्या नाखूश होत्या. असे केल्याने अमेरिकन कंपन्यांशी असणारे संबंध किंवा अमेरिकेतील त्यांच्या कामकाजावर परिणाम होऊ शकण्याची भीती त्यांना वाटत होती. असे असताना भारत सरकारनेही इराणशी संबंध जपताना अमेरिकेच्या निर्बंधांचा विचार केला आहे. यामागील कारण म्हणजे भारताचे सर्वांगीण हित इराणपेक्षा अमेरिकेशी जास्त जोडलेले आहे. तरीही याचा अर्थ इराण आणि भारताने आपले संबंध पुढे नेऊ नयेत, असा होत नाही.

या कराराला अंतिम स्वरूप दिल्यानंतर अमेरिकेपासून चीन तसेच पाकिस्तानपर्यंत विविध देश चिंतेत पडले आहेत. मूलत: चाबहार हा बलुची वाक्प्रचार 'चाहर बहार'चे छोटे रूप आहे. यामध्ये चाहर म्हणजे चार आणि बहार म्हणजे वसंत. या शब्दाचा अर्थ समजून घेतला तर वर्षातील चारही ऋतू वसंत ऋतूसारखे असणारा भाग म्हणजे चाबहार. परदेशातील एखाद्या बंदराचे व्यवस्थापन भारताकडे घेण्याची ही पहिलीच वेळ आहे. आधी उल्लेख केल्याप्रमाणे चाबहार बंदर इराणच्या दक्षिणेकडील किनारपट्टीवर सिस्तान–बलुचिस्तान प्रांतात आहे. या स्थानामुळेच ते भारतासाठी खूप खास आहे. पाकिस्तानच्या ग्वादर बंदरापासून ते केवळ ७२ किलोमीटर अंतरावर आहे. चाबहार हा 'इंटरनॅशनल नॉर्थ–साउथ ट्रान्सपोर्ट कॉरिडॉर' (आयएनएसटीसी) चा एक भाग आहे. हा एक बहु–मॉडेल वाहतूक प्रकल्प आहे. हा प्रकल्प हिंद महासागर आणि पर्शियन गल्फला रशियातील सेंट पीट्सबर्ग मार्गे इराण आणि उत्तर युरोपला कॅस्पियन समुद्राशी जोडतो. चीन आणि पाकिस्तान अस्वस्थ असण्याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. चाबहार बंदराबाबत भारत आणि इराणमधील कराराची सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे पाकिस्तानच्या ग्वादर बंदर आणि चीनच्या 'बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह'ला भारताने दिलेले उत्तर म्हणूनच याकडे पाहिले जात आहे.

भारत गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या महत्त्वाकांक्षी 'नेक्स्टल ऑफ डायमंड' प्रकल्पावर काम करत आहे. या प्रकल्पासाठीही चाबहार बंदर अत्यंत महत्त्वाचे आहे. चीनला सर्व बाजूंनी घेरणे हा या रणनीतीचा उद्देश आहे. या रणनीतीअंतर्गत भारत आपल्या नौदल तळांचा विस्तार करत असून चीनच्या रणनीतींना तोंड देण्यासाठी सामरिकदृष्ट्या मजबूत देशांशी संबंध सुधारत आहे. भारताच्या या रणनीतीमध्येही चाबहार हा अत्यंत महत्त्वाचा थांबा आहे. खेरीज चाबहार कॉरिडॉरअंतर्गत भारत, इराण, अफगाणिस्तान, आर्मेनिया, अझरबैजान, रशिया, मध्य आशिया आणि युरोपमधील मालाची वाहतूक करण्यासाठी जहाज, रेल्वे आणि रस्त्यांचे ७,२०० किलोमीटर लांबीचे जाळे तयार केले जाणार आहे. या मार्गामुळे भारताचा युरोपमध्ये प्रवेश सोपा होणार आहे. अशा एक ना अनेक अर्थांनी हा करार महत्त्वाचा आहे.

# ‘गुरु आनंद तीर्थ’चे काम प्रगती पथावर



महापुरुषांचे जीवन पाण्याच्या धारेसमान असते, जी आधी एकदम छोटी असते, ती वाढत जाऊन पुढे सागर बनते. गंगोत्री गंगासागराचे रूप घेते त्याप्रमाणे महापुरुषांचे जीवन सुरुवातीला छोटे असते ते वाढत जाऊन विराट व शेवटी- अनंत होते. अशा महापुरुषांकडून झालेले कार्य विश्वव्यापी असते, त्यांनी केलेले चिंतन विश्वाला उपयोगी पडते व हे महापुरुष विश्वाचे प्रतिनिधीत्व करतात, विश्वाला मार्गदर्शन करतात.

असेच आजच्या युगातील एक महापुरुष आचार्य सम्राट आनंदऋषीजी महाराज. ज्यांचे कर्तृत्व हिमालयासारखे व करुणा सागरासारखी. अशा आनंदऋषीजी महाराजांचे जन्मगाव चिचोंडी, त्यांच्या पदस्पर्शाने पावन झाली. अशा पावन ऊर्जेने संपन्न चिचोंडीत त्यांचेच सुशिष्य महापुरुष उपाध्याय प्रवीणऋषिजी महाराजांच्या प्रेरणा व कुशल मार्गदर्शनात ‘गुरु आनंद तीर्थ ’ हे भव्य दिव्य तीर्थ उभारणीचे काम गुरु आनंद फाऊंडेशनद्वारे सुरू झाले.

यातील पहिल्या टप्प्याचा लोकार्पण समारोह १७ डिसेंबर २०१७ रोजी सुमारे दहा हजारांहून जास्त गुरु भक्तांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

केवळ धार्मिकच नाही तर मानव सेवा, समाज प्रबोधन, शिक्षण, व्यक्ती व समाज विकास- कल्याण अशा अनेक प्रयोजनातून येथे सप्ततीर्थ निर्मिती होत आहे. यामधे आत्तापर्यंत गुरुचरण तीर्थ, साधू भवन, साध्वी भवन, भक्तनिवास , भोजनालय पूर्ण झाले असून नवकार कलश- गौतम लब्धि पीठ, श्रुतपीठ गर्भसंस्कार केंद्र, संलेखना केंद्र, अष्टमंगल ध्यान केंद्र, भव्य दिव्य पुरुषाकार - अष्टमंगल कमलाकृती ध्यान केंद्र आदिंचे निर्मिती कार्य प्रगतीपथावर आहे

दि १८ मे २०२४ रोजी चतुर्विध शासन स्थापना दिवशी साधू-साध्वी केंद्र, ऑडिटोरीयम -कार्यालय आणि अर्हम तीर्थ या सर्वांचे भूमीशुध्दीकरण तसेच अर्हम विज्ञा रिसर्च प्रकल्प च्या नियोजित स्थानी वृक्षारोपणाचा कार्यक्रम हजारो गुरुभक्तांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.

साध्वी साधना केंद्र हे पुणे येथील प्रतिष्ठीत उद्योगपती, निष्ठावंत गुरुभक्त रमणलाल कपूरचंद लुंकड यांच्या वित्त सहयोग-समर्पणाने निर्मित होत आहे. अर्हम तीर्थामुळे बाराही महिने अर्हम विधीचा, तंत्राचा गुरुभक्तांना लाभ मिळेल. हे तीर्थ देशभरातील समस्त गुगळे परिवाराने केलेल्या वित्त सहयोग - समर्पणाने निर्मित होत आहे.

श्रमण साधना केंद्र व ऑडिटोरीयम हे अनाम गुरुभक्तांच्या समर्पणातून होत आहे.

अर्हम विज्ञा फाऊंडेशनच्या माध्यमातून क्रांतिकारी विचार उपाध्याय प्रवीणऋषीजींच्या प्रगल्भ, सखोल मार्गदर्शनात चालणाऱ्या विविध साधनांचा लाभ भारतच नाही तर विदेशातील लाखो लोक घेत आहेत. या सर्व उपक्रमांचा अभ्यास मार्गदर्शन करण्याहेतू अर्हम विज्ञा विद्यापीठाचे निर्माण होत आहे. पोपटलाल ओस्तवाल व राजकुमार चोरडिया यांनी सुमारे १५ एकर जागा गुरु आनंद फाऊंडेशनला उपलब्ध करून दिली. येत्या ७ महिन्यात हे सर्व प्रकल्प पूर्ण होऊन गुरुभक्तांसाठी सज्ज होणार आहे. अशा या तीर्थाकडे आज जगभराचे डोळे लागले आहेत.

# सामाजिक बांधिलकी



संवेदनशीलता हा माणसाचा अंतस्थायी भाव आहे. पण कोणत्याही गोष्टीची सुरुवात स्वतः पासून करावी, सामाजिक बांधिलकी जपावी इतकी संवेदनशीलता प्रत्येकाकडे नसते. आजूबाजूला घडणाऱ्या अनेक घटनांवर आपण भाष्य करतो खरे पण कृती करताना आपल्या मर्यादा ओळखून वागतो. काही लोक याला अपवाद असतात. स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करून सामाजिक बांधिलकी जपणारे समाजातील सजीव घटकांवर आपलं म्हणून काम करणारे अनेक लोक अवतीभवती असतात. गरिबांना अन्नदान करणाऱ्या लोकांपासून ते थंडीत कुडकुडत रस्त्यावर झोपलेल्या लोकांना पांघरूण देणाऱ्या खूप लोकांमुळे माणुसकीची भिंत आपण पाहिली आहे. डॉक्टर गिते, संजय अडोळे यांच्यासारख्यांनी चांदबीबी महालावर मोरासाठी, हरणांसाठी शेततळे बांधले आहे. भाकड म्हणून सोडून दिलेल्या गाईंना चारा, निवारा देण्याचा प्रयत्न करणाऱ्या भावना वैकर आणि कसायाकडे गेलेल्या गाईंना सोडवून आणून त्यांच्यासाठी छत्र उभे करणारे गौतम कराळे, रस्त्यावरच्या कुत्र्यांना औषधपाणी करुन छत्र देणारे अमोल कनगरे, कीर्ती बेलेकर, राधिका रणभोर अशी खूप नावे नगरच्या इतिहासावर वर्तमान जगत आहेत. या सर्वांसारख्या एका गृहिणीच्या संवेदनशील तरल मनाने भटक्या कुत्र्यांना जेवण देणे, अंधारात हे कुत्रे दिसावेत म्हणून रेडियमचे पट्टे गळ्यात घालणे आणि कुत्र्यांचे निर्बीजीकरण करणे हा निर्णय घेतला. कामाला सुरुवात केली आणि सलग तीन वर्षे त्या काम देखील करत आहेत ही जनजागृती सर्वांपर्यंत पोहोचावी या प्रांजळ हेतूने आज हा लेखनप्रपंच आहे.

महाराष्ट्रात १२,७६,३९९ इतकी भटक्या कुत्र्यांची संख्या आहे. गंभीर स्थिती म्हणजे यापैकी ७० टक्के कुत्रे हे बेघर आहेत. दिवसेंदिवस त्यांची वंशावळ मारुतीच्या शेपटीसारखी वाढतच आहे. लोकांकडून त्या पिल्लांची होणारी उपेक्षा प्रसंगी मारहाण, गाड्यांमुळे होणारे त्यांचे अपघात, उपचारापूर्वी झालेला मृत्यू हे सगळे विदारक चित्र पाहून सविताताईंचे अंतःकरण कळवळत होते. झोपलेल्या कुत्र्यांना हाकलणे, दगडाने घायाळ करणे लोकांची ही कृती सविताताईंच्या ह्रदयाला घरं पाडत होती. त्यांच्यासाठी काहीतरी करण्याची इच्छा सविताताईंमध्ये जागृत झाली. अशा अनेक विचारांनी आणि दृश्यांनी अस्वस्थ झालेल्या सविताताईंनी पहिले स्वखर्चातून भटक्या कुत्र्यांना अन्न देण्याचे ठरवले. अभ्यास केल्यावर आणि प्राण्यांच्या डॉक्टरांसोबत सल्लामसलत केल्यानंतर ते चारा गवत खाऊ शकत नाहीत, त्यामुळे ते पूर्णपणे अन्नासाठी मानवावर अवलंबून असतात. त्यांच्यासाठी डॉग फूड हेच अन्न आहे हे समजले. शिवाय ते बरेच खर्चिक आहे हेही कळाले.पण उचललेले पाऊल पुढे न्यायचे हा संकल्प ठरलेला होता म्हणून सविता गिरीश पाखरे ताईंनी ‘मोती श्वान फाऊंडेशन’ साकारले ज्याद्वारे भटक्या कुत्र्यांना स्वखर्चाने डॉग फूड देणे सुरू केले. आता पुढे फक्त अन्न देऊन थांबणे शक्य नव्हते. झपाट्याने वाढणाऱ्या भटक्या कुत्र्यांची संख्या कमी होणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे हे लक्षात घेऊन काम सुरू केले आहे. निर्बीजीकरण संदर्भात काम करण्यासाठी कमीत कमी तीन वर्षांचा संस्थेच्या कामाचा अनुभव आवश्यक असतो. खरे तर महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण महानगरपालिकेने प्रामाणिकपणे करणे आवश्यक आहे. त्यासाठी नागरिकांनी महानगरपालिका



सविता गिरीश पाखरे

प्रशासनावर दबाव निर्माण करणे आवश्यक आहे. वास्तविक तसे होताना दिसत नाही हे लक्षात घेऊन आता जनतेनेच पुढाकार घेतला पाहिजे हा विचार मोती फाऊंडेशन सर्वांपर्यंत पोहोचवू इच्छित आहे. संस्थेच्या आर्थिक कुवतीनुसार सुरुवातीला परिसरातील साधारणतः ५० भटक्या कुत्र्यांना एक वेळचे पोटभर अन्न देता आले. जवळपास पाचशे कुत्र्यांना अपघातापासून बचावासाठी गळ्यात रेडियमचे पट्टे देखील घालण्याचा संस्थेचा मानस आहे. संस्थेस कोणताही शासकीय अथवा देणगीदार निधी प्राप्त होत नाही त्यामुळे वैयक्तिक खर्च सुरू आहे. महिन्याला अंदाजे रु. २१००० असा खर्च सविताताई स्वतः करत आहेत. सविताताईंच्या या सामाजिक कामात त्यांना सढळ हाताने मदत करणाऱ्या हातांची गरज आहे. जेणेकरुन जास्तीत जास्त भटक्या कुत्र्यांसाठी अन्न देणे सुलभ होईल असे त्यांनी मत व्यक्त केले आहे. आपापल्या भागातील भटक्या कुत्र्यांसाठी रेडियमचे पट्टे संस्थेकडून घेऊन जाण्याचे आवाहन ताईंनी केले आहे.

अधिक माहितीसाठी संस्थेच्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध आहे. सविताताईंना खात्री आहे की ज्याच्या ठायी भूतदया आहे तो प्रत्येकजण ‘मोती श्वान फाऊंडेशनच्या मदतीला उभा राहणार आहे.

संकेतस्थळ www.motishwanfoundation.org

**- प्रा. स्मिता भुसे**

## शब्दकोडे-२०

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ■ | ५ | | ६ | ■ | ७ | ■ | ८ |
| ९ | | ■ | १० | ११ | | | | ■ | | ■ | १२ | | |
| १३ | | | ■ | | ■ | ■ | १४ | १५ | | १६ | | ■ | |
| ■ | | ■ | १७ | | १८ | १९ | ■ | | ■ | | ■ | २० | |
| २१ | | ■ | | ■ | २२ | | ■ | २३ | २४ | | २५ | ■ | |
| | ■ | २६ | | | | ■ | २७ | | | ■ | २८ | | |
| २९ | | ■ | | ■ | ■ | ३० | | ■ | ३१ | ३२ | | ■ | ■ |
| | ■ | ३३ | | | ३४ | ■ | ३५ | ३६ | | | ■ | ३७ | |
| ३८ | | | | ■ | ३९ | ४० | | | ■ | ४१ | ४२ | | ■ |
| | ■ | | ■ | ४३ | | | ■ | ४४ | ४५ | ■ | ४६ | | ४७ |
| | ■ | ४८ | | | ■ | ४९ | | | | ■ | | ■ | |
| ■ | ५० | ■ | ■ | ५१ | ५२ | | ■ | ५३ | | ■ | ५४ | ५५ | ■ |
| ५६ | | ■ | ५७ | | | ■ | ५८ | ■ | ५९ | ६० | | | ६१ |
| ६२ | | | | ■ | ६३ | | | | ■ | | ■ | ■ | |

**आडवे शब्द**

१) नवीन कामास सुरुवात
५) हाट
९) कंबर, मद, कैफ, मस्ती
१०) लोकसंख्येची मोजणी
१२) मोकळा
१३) एक मोठे चर्मवाद्य
१४) उणीव, चणचण
१७) थोडे-फार
२०) देवता विशेष, द्रव्य
२१) उदार मनाने देणारा
२२) रुची, स्वाद
२३) चित्रपटाची थोडक्यात गोष्ट
२६) उगाच, कारण नसताना
२७) मीठाची चव
२८) बुटका, बटु
२९) बगीचा
३०) पर्ण
३१) मर्कट
३३) च्या बद्दल
३५) पुढे ढकलणे
३७) प्रवासातील एक टप्पा
३८) कृत्य करण्यास घाबरणे
३९) गजवदन
४१) रात्र
४३) सरोवर, तलाव
४४) सत्वांश
४६) मऊ
४८) टक, दृष्टी
४९) रमापती, श्रीविष्णू
५१) सबब, निमित्त
५३) दरोडा
५४) वेडा
५६) पाण्याचा उसळलेला तरंग
५७) वांगे भाजून केलेला चमचमीत पदार्थ
५९) मनास वाटेल तेथे मुक्काम करणारा, भटक्या, गोसावी
६२) भूक, वखवख
६३) शूर पुरुष

**उभे शब्द**

१) महाशय, श्रीयुत
२) हत्तीसारखी ऐटीत चालणारी
३) फांदी, उपविभाग
४) वास्तव्य
५) लहान, छोटा
६) चांदी
७) नदी
८) चीजवस्तू
११) सदोदित
१५) भ्रमर, भुंगा
१६) दात
१७) भरपुर चोप देणे (वा.प्र.)
१८) त्रासिक, छळणारा (नियम )
१९) च्या साठी(क)
२१) गयावया करणे
२४) शोभिवंत दिसण्यासारखी रचना, भपकेबाज रचना
२५) दरवाजा
२७) घराणे
३२) एक जंगली फूल
३३) पोते
३४) धट्टाकट्टा
३६) दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखणारा
३७) भाजीतील दुधाच्या वड्या
४०) झोपेचे खोबरे
४२) जन्मदेणारे वडील
४३) भाजी
४५) मंत्रीमंडळ
४७) झकास, छान
५०) कैद
५२) रत्न
५५) अवघा, सगळा,
५६) प्राप्ती, फायदा
५७) पिशाच्यासाठी ठेवला नैवेद्य
५८) काव्य करणारा
६०)खुषी, मनाची इच्छ
६१) संन्यासाचे निवासस्थान

## शब्दकोडे-१९ चे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वि | पु | ल | ■ | स | मा | धा | न | का | र | क | ■ | व | र्ष |
| का | ल | ■ | आ | ड | ■ | ■ | व | न | वा | स | वा | डी | ■ |
| स | दे | ह | ■ | पा | रा | वा | र | ■ | न | ■ | स | ल | ग |
| ■ | श | र | पा | त | ■ | चा | स | ■ | गी | त | ■ | धा | वा |
| ■ | पां | ■ | व | ळ | व | ळ | ■ | प | ■ | म | दा | री | ■ |
| सा | डे | सा | ती | ■ | र्त | ■ | न | र | म | ■ | न | ■ | को |
| ख | ■ | ग | ■ | क | न | क | ■ | स | म | जू | त | दा | र |
| र | ख | र | खा | ट | ■ | हा | ■ | दा | ■ | न | ■ | त | ■ |
| पे | ■ | त | र | ■ | क | णी | दा | र | ■ | ■ | ■ | खि | ळी |
| र | पे | ट | ■ | क | र्ज | ■ | णा | ■ | न | वे | ■ | ळी | ■ |
| णी | ■ | ■ | क | ड | बा | ■ | दा | स | ■ | स | र | ब | त |
| ■ | स | मा | न | ■ | जा | र | ण | मा | र | ण | ■ | स | ■ |
| ब | द्दा | ■ | दा | ■ | री | त | ■ | धा | म | ■ | ग | णे | श |
| ळ | ■ | प | र | त | ■ | न | य | न | ■ | स | र्व | ■ | र |

## आपले भविष्य

दि.२६/०५/२०२४ ते ०१/०६/२०२४

**शिरीष कुलकर्णी**
**मो.नं.८७८८२६६६९०**

### मेष: मौल्यवान वस्तूंची खरेदी होईल.

कौटुंबिक आघाडीवर सुख, सुसंवाद आणि समारंभातून आनंद लाभेल. तुमच्या राशीतील हर्षल महत्वाच्या प्रसंगात उतावळेपणा करणारा आहे तर शुक्र भ्रमण कपडे, दागिने किंवा मौल्यवान वस्तूंची खरेदी करता प्रोत्साहन देणारे आहे. उत्तरार्धातील शनी भ्रमण तुमच्या व्यावसायिक मनसुबे पूर्ण करणारे आहे. सप्ताहाच्या शेवटी भावनोद्रेकामुळे घरगुती वातावरणात तणाव निर्माण होतील.

### वृषभ: दैनंदिन कामे उत्साहाने पार पडतील.

धार्मिक आणि तात्विक वांग्मयाची गोडी वाढेल. जवळच्या नात्यातील ओलावा टिकून राहण्यासाठी तुम्हाला विशेष प्रयत्न करावे लागणार आहेत. तुमच्या राशीतील शुक्र भ्रमण महिलांसाठी कपडे, स्त्रियांच्या वस्तूंच्या खरेदीचा आनंद देणारे आहे. दैनंदिन कामे उत्साहाने पार पडतील. यश प्राप्तीचे उद्दिष्ट ठेऊन नोकरदारांना सातत्याने प्रयत्नशील रहावे लागेल.

### मिथुन: व्यापारी उत्तम अर्थार्जन करतील.

गुरु भ्रमण औदार्याचा आणि परोपकाराचा अतिरेक करण्याची शकयता आहे. शुक्र भ्रमण तात्कालिक आणि क्षणिक सुख प्राप्तीच्या मागे धावायला लावेल. करमणूक आणि जल्लोषात सामील व्हाल. उत्तरार्ध अंतःस्फुर्तीने शुभाशुभ संकेतांचा लाभ करून देणारा आहे. सप्ताहाच्या शेवटी उत्तम स्मरण शक्ती आणि व्यावहारिक हुषारीने व्यापारी उत्तम अर्थार्जन करू शकतील.

### कर्क : रेंगाळलेल्या अपेक्षांची पूर्तता होईल

वाचन आणि साहित्याची विशेष आवड निर्माण होईल. गुरु भ्रमण आर्थिक सुबत्ता देणारे, नोकरदारांना प्रशंसा योग्य कामगिरी करण्यासाठी सहजता देणारे आणि रेंगाळलेल्या अपेक्षांची पूर्तता करणारे आहे. विविहेच्छुंना सुसंस्कारी आणि सुविद्य जोडीदाराचा लाभ होईल. अभिनय, नृत्य अशा कलाक्षेत्रातील कलाकार विशेष प्रगती करतील. सप्ताहांती आंतर्मनातून लाभलेल्या प्रभावी संकेतांकडे दुर्लक्ष करू नका.

### सिंह : पती पत्नीत सामंजस्य हवे.

वादविवादातून निराश होण्याची परिस्थिती येऊ शकते. नोकरी आणि उद्योगात परिस्थिती सामान्य असली तरी त्यावर तुमचा प्रभाव उत्तम राहील. निर्णय विचारपूर्वक आणि कृती सावधपणे करा. कौटुंबिक आघाडीवर पती पत्नीत सामंजस्य हवे. अष्टमातील मंगळ शारीरिक आणि मानसिक स्थिती अस्थिर ठेवेल. सप्ताहाच्या शेवटी बुद्धीच्या प्रभावाने आणि चाणाक्षपणे सर्व समस्यांचे समाधान शोधाल.

### कन्या : साधकांना गुरुकृपेची अनुभूती लाभेल

परिस्थितीची धास्ती वाटत राहिली तरी गुरु आणि शनी भ्रमण तुमची भीती व्यर्थ ठरवून अनुकूल घटना घडवतील. अध्यात्मिक क्षेत्रातील साधकांना गुरुकृपेची अनुभूती लाभेल. धार्मिक आणि सामाजिक उत्सवात सहभागी होण्याची संधी प्राप्त होईल. उत्तरार्धात चिकाटीने आणि परिश्रमपूर्वक नोकरी आणि व्यवसायातील स्वतःच्या जबाबदाऱ्या पार पडाल. आपल्या निर्णयांची दिशा योग्य असल्याची खात्री करून घ्या.

### तूळ : सुखोपभोगात गुंतत रहाल

.व्यावसायिक व्यस्ततेमुळे कौटुंबिक जीवनाकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता आहे. राहू आणि मंगळ विरोधी वातावरणाशी संघर्ष करायला लावतील. मुलामुलींच्या भवितव्याबाबत चिंता वाटत राहील. ऐहिक जीवनात आणि सुखोपभोगात अधिकाधिक गुंतत रहाल. उत्तरार्धात पतीपत्नीतील गैरसमज आणि वादविवाद नैराश्याचा प्रभाव करणारे आहेत. सप्ताहांती स्वतःचे म्हणणे मांडताना संभाव्य भांडणे टाळण्यासाठी धारदार शब्द प्रयोग टाळा.

### वृश्चिक : छंद जोपासाल.

गुरु भ्रमण कौटुंबिक सुख्वृद्धी करणारे, संतातीकडून समाधान देणारे आहे. कौटुंबिक सदस्यांचे स्वास्थ्य रक्षण करताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ देऊ नका. पत्नीच्या इच्छा आकांक्षांना न्याय देणे सध्यातरी तुम्हाला कठीण जाईल. उत्तरार्धात घरगुती छोट्या छोट्या अडचणी सोडविण्यात व्यस्त रहाल तर सप्ताहाच्या शेवटी कला आणि छंद जोपासाल.

### धनु : आहार विहारामध्ये नियमितता आवश्यक

स्वतःचा अहंकार बाजूला ठेवलात तर जवळची नाती सुदृढ राहतील. आहार विहारामध्ये नियमितता येणे आवश्यक आहे. कोणत्याही कौटुंबिक चर्चेचे रुपांतर व्यर्थ वादात होणार नाही याची खबरदारी घ्या. शनी भ्रमण मोठ्या जिद्दीने आणि परिश्रमाने यशप्राप्तीच्या मार्गाने वाटचाल करण्याची प्रेरणा आणि ताकद देणारे आहे. आंतर्मनाचे सुभाशुभ संकेत दैनंदिन जीवनात उपयोगी पडतील.

### मकर : व्यापाऱ्यांना भांडवल टंचाई जाणवेल.

जीवनात प्रतिष्ठित व्यक्तीमत्वांचा पाठींबा लाभेल. संततीच्या सर्वांगीण प्रगतीचे पालक या नात्याने समाधान लाभेल. डोळसपणे व्यवहार केले तर शेअर बाजारातून अपेक्षित अर्थार्जन करता येईल. एखाद्या कलेचे पुरस्कर्ते रहाल. उत्तरार्धातील शनी भ्रमण व्यापाऱ्यांना भांडवल टंचाई निर्माण करणारे आहे. सप्ताहांती दैनंदिन जीवनावर भावनांचा प्रभाव राहील.

### कुंभ : अंतःस्फुर्तीचा प्रत्यय येईल.

स्वतःच्या आरोग्य संबंधाने काही व्याधींचा त्रास होण्याची शक्यता आहे. योग्य त्या पथ्य पाण्याने त्रास कमी होतील. मंगळवारी संसारात आनंद देणाऱ्या घटना घडतील. तुमच्या राशीत असलेला शनी विविध प्रकारचे व्यावसायिक अडथळे आणणारा तसेच परिश्रमाने उर्जा कमी करणारा आहे. सप्ताहांती तीक्ष्ण संवेदना अंतःस्फुर्तीचा प्रत्यय देतील. वाचासिद्धी समान अनुभूती लाभेल.

### मीन : कलाकार उत्तम कला निर्मितीत दंग राहतील

राशीस्वामी गुरु परोपकाराचा विपर्यास करण्याची शक्यता आहे. अहंकाराने नाती दुरावण्याची शक्यता आहे. अपेक्षित घडामोडी घडतील. शनी भ्रमण आरोग्य आणि अर्थ अशा दोन्हीवर ताण आणणारे राहील. उत्तरार्धात अनपेक्षित धनलाभ होण्याची शक्यता आहे. सप्ताहाच्या शेवटी कला आणि करमणुकीचा आनंद घ्याल. कलाकार उत्तम निर्मितीत दंग राहतील

PDF Compressor Free Version



# पुण्यात बॅडमिंटन खेळाचे भविष्यवेधी प्रयोग-खेळाडूंचा चांगला प्रतिसाद




**समाचार/नगर-दि.२५**

सर्वच खेळामधील खेळाडूंची,प्रेक्षकांची रुची वाढावी यासाठी जागतिक पातळीवर नियमावलीत बदल करून त्यातील आकर्षकता वाढवून त्या-त्या खेळाचा अधिक प्रसार करण्याचा प्रयत्न होताना दिसतात.असाच बदल बॅडमिंटन या खेळात करण्याचा प्रयत्न होत असून अशा स्पर्धात्मक बदलातून बॅडमिंटन खेळ निश्चितच अजून बहरेल असे उद्गार पुण्याचे ए टी एस प्रमुख दत्तात्रय दराडे यांनी काढले. बॅडमिंटन खेळाच्या भविष्यातील विकासासाठीचा एक स्पर्धात्मक बदल म्हणून पुण्यातील फिटनेस तज्ज्ञ मिहीर तेरणीकर आणि प्रसिद्ध बॅडमिंटनपटू आर्य भिवपाठकी ,यश शाह ( अ.नगर) यांच्या पुढाकाराने बॅडमिंटन खेळामध्ये ट्रीपल्स पल्स (३ वि ३) आणि ५ वि ५ अशा दोन नाविन्यपूर्ण प्रकारातील स्पर्धांचे आयोजन नुकतेच शिवाजीनगर येथील मॉडर्न पीडीएमबीए स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे करण्यात आले याप्रसंगी श्री दत्तात्रय दराडे बोलत होते होते.

पुण्यातील सर्व बॅडमिंटनप्रेमींना एकत्र आणून या खेळाचा आनंद नव्या, गतिमान, आकर्षक, रोमांचक पद्धतीने देण्यात यावा व त्यासाठी एक स्पर्धात्मक व्यासपीठ उपलब्ध व्हावे हा या मागचा प्रमुख उद्देश होता अशी माहिती आंतरराष्ट्रीय कोच मिहीर तेरणीकर, बॅडमिंटनपटू आर्य भिवपाठकी,व यश शाह यांनी दिली .

या स्पर्धेचे बक्षीस वितरण दत्तात्रय दराडे यांच्या हस्ते करण्यात आले विजेता संघ मॉडर्न ट्रीपल्स -श्रेयश साने,अथर्व ख्रिस्ती सानिया तापकीर याना व कॉस्मिक सायक्लोन्स ,व क्लासिकस ट्रीपल्स संघाना दत्तात्रय यांच्या हस्ते विजेता करंडक व स्मृती चिन्ह देऊन गौरविण्यात आले पुण्यातील या नावीन्य पूर्ण बॅडमिंटनमधील बदलाच्या स्पर्धेच्या आयोजनाचे सर्वत्र कौतुक होत आहे आभार मिहीर तेरणीकर यांनी मानले .



# बुद्धिबळ खेळ जोपासल्यास सर्वांगीण विकास : फिरोदिया

**समाचार/नगर-दि.२५**

विद्यार्थी दशेत बुद्धिबळ हा खेळ विद्यार्थ्यांनी जोपासल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास सर्वतोपरी होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन आशा एज्युकेशन फाउंडेशन तथा अहमदनगर बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी केले.

नगर शहरातील जय बजरंग विद्यालयामध्ये शालेय अंतर्गत बुद्धिबळ प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन अहमदनगर बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते आज (ता. २१) रोजी करण्यात आले. यावेळी आशा एज्युकेशन फाउंडेशनचे सहसचिव उमेश गांधी, विद्यालयाच्या प्राचार्या संगीता पाठक, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर, तपोवन माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका वर्षा कुसकर, अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सचिव यशवंत बापट, खजिनदार सुबोध ठोंबरे, सदस्य पारुनाथ ढोकळे, संदीप देसरडा, व्यवस्थापक आशुतोष घाणेकर आदी उपस्थित होते.

# निवृत्ती वेतन धारकांना सूचना

**समाचार/नगर-दि.२५**

जिल्हा कोषागारामार्फत निवृत्तीवेतन धारकांना निवृत्तीवेतन, सुधारित निवृत्तीवेतन, कुटूंबनिवृत्तीवेतन तसेच निवृत्तीवेतन विषयक इतर लाभ प्रदान करण्यात येतात. हे लाभ प्रदान करताना कोणत्याही प्रकारे वसुलीबाबत किंवा प्रदान करण्यात येणाऱ्या रकमेबाबत कोषागार कार्यालयामार्फत फोन करून संपर्क साधला जात नाही. तसेच ऑनलाईन व्यवहार करण्याविषयी सूचित केले जात नाही. कोणीही अशा दूरध्वनी संदेशास प्रतिसाद देऊ नये, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी भाग्यश्री जाधव भोसले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

काही निवृत्तीवेतनधारकांना फोन करून ऑनलाईन रक्कम भरल्यानंतर कोषागारातील थकीत रक्कम मिळणार असल्याचे सांगितले जाते. याबाबतच्या तक्रारी कोषागार कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत, अशा कोणत्याही प्रकारचा फोन जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत केला जात नाही किंवा कोषागार कार्यालयातील कर्मचाऱ्यास निवृत्तीवेतनधारकांच्या घरी पाठविले जात नाही.

निवृत्तीवेतन धारकांना दूरध्वनी, भ्रमणध्वनीवरून प्रदाना संदर्भात संपर्क साधून रक्कम ऑनलाईन, गुगल पे, फोन पे किंवा इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे भरण्याबाबत जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत कळविले जात नाही. कोणीही अशा दूरध्वनी संदेशास प्रतिसाद देऊ नये. याबाबत निवृत्तीवेतनधारकांनी परस्पर रक्कम भरल्यास ती निवृत्तीवेतनधारकाची वैयक्तिक जबाबदारी राहील. तसेच अशा प्रकारचे दूरध्वनी प्राप्त झाल्यास कोषागार कार्यालयास अवगत करावे. तसेच कोणतेही व्यवहार करण्यापूर्वी अथवा शंका असल्यास प्रथमतः कोषागार कार्यालयाशी संपर्क साधण्यात यावा, असेही भाग्यश्री जाधव भोसले व अप्पर कोषागार अधिकारी (निवृत्तीवेतन) दीपक काटे यांनी कळविले आहे.

# आठरे पब्लिक स्कूलमध्ये अकरावीचे वर्ग सुरू

**समाचार/नगर-दि.२५**

सावेडी विभागातील वडगाव गुप्ता रोड येथील आठरे पाटील पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळेत आगामी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग सुरु करण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी विज्ञान व वाणिज्य (इंग्रजी माध्यम) या दोन्ही शाखेत प्रवेश देण्यात येणार आहेत.

इ.११ वी शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या आवडीप्रमाणे मेडिकल कॉलेज प्रवेशासाठी आवश्यक नीट आणि इंजिनिअरिंगच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेला जेईई च्या स्पर्धा परीक्षांची तसेच एमएचसीईटी परीक्षेद्वारे होणाऱ्या शास्त्र शाखेच्या इतर प्रवेशासाठीची स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेतली जाईल व त्यासाठी विद्यार्थ्यांच्या सोयीप्रमाणे त्यांच्या मागणीनुसार वेळेत आवश्यक ते बदल करून नीट, जेईई आणि एमएचसीईटी च्या स्पर्धा परीक्षांच्या विशेष मार्गदर्शनाची व्यवस्था केली जाईल. तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या मागणीप्रमाणे महाराष्ट्र स्टेट बोर्डच्या अभ्यासक्रमांबरोबर एनसीईआरटी चा अभ्यासक्रम शिकविण्याची व्यवस्था केली जाईल. तसेच पीसीएम, पीसीएमबी आणि पीसीबी ग्रुपसाठी स्वतंत्रपणे विशेष मार्गदर्शन केले जाईल.

इ.११ वी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी काळाची गरज ओळखून इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याची व्यवस्था केलेली आहे. तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे कंपनी सेक्रेटरी आणि सीए फाऊंडेशन च्या विशेष मार्गदर्शनाची व्यवस्था केली आहे.

सन २०२४-२५ या आगामी शैक्षणिक वर्षात शाळेत कनिष्ठ महाविद्यालयाचे इयत्ता अकरावी विज्ञान व वाणिज्य या दोन्ही शाखांचे नवीन इंग्रजी माध्यमांचे वर्ग सुरु होत आहे. या वर्गात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन अद्ययावत सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन चंद्रभान आठरे पाटील ग्राम नवोदय ट्रस्ट, अहमदनगर या संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल आठरे पाटील व कार्यकारी विश्वस्त ॲड. विश्वासराव आठरे यांनी केले आहे.

# सह्याद्री ज्युनियर कॉलेजची शंभर टक्के निकालाची परंपरा कायम

**समाचार/नगर-दि.२५**

श्री साई शैक्षणिक व बहुउद्देशीय संस्थेच्या सह्याद्री इंटरनॅशनल जुनियर कॉलेजने बारावीत १०० टक्के निकाल लावून सलग दुसऱ्या वर्षी १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली.

कॉलेजचे एकूण ८९ विद्यार्थी परीक्षेला बसलेले होते त्यापैकी १६ विद्यार्थ्यांना विशेष प्राविण्य म्हणजेच ७५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळालेले आहेत व कॉलेजच्या ६२ विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी म्हणजेच ६० टक्के पेक्षा जास्त गुण मिळालेले आहेत व ११ विद्यार्थी द्वितीय श्रेणीमध्ये उत्तीर्ण झालेले आहेत. महाविद्यालयाच्या भक्ती चापे या विद्यार्थिनीने ८८.१७ टक्के गुण (जनरल ग्रुप) घेऊन प्रथम क्रमांक, पुष्कर लाकूडझोडे या विद्यार्थ्यांनी ८७.३३% गुण घेऊन द्वितीय क्रमांक व अथर्व वाघचौरे याने चरींही विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत ८७% गुण घेउन तृतीय क्रमांक मिळवला. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या उत्तुंग अशा यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सच्चिदानंद घोणसे, सचिव, प्राचार्य बाळासाहेब कीर्तने, खजिनदार नारायण शिनगारे व समन्वयक मनोज पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे व त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

## राज्यस्तरीय अहिल्यादेवी वक्तृत्व स्पर्धेला प्रारंभ

# विचार भारतीच्या उपक्रमांनी वैचारिक प्रबोधन- डॉ. पंडित



**समाचार/नगर-दि.२५**

तरुण हे देशाची शक्ती आहे. या तरुणांना योग्य दिशेने व विचाराने पुढे नेणे आवश्यक आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी समाजोपयोगी खूप मोठे कार्य केले आहे. त्यांच्या या संघर्षमय जीवनाची ओळख नव्या पिढीला होणे आवश्यक आहे. त्यांचे कार्य पुढे नेण्यातच देशाचे व तरुणांचे हित आहे. यासाठी विचार भारतीचा अहिल्यादेवींच्या नावाने वत्कृत्व स्पर्धेचा उपक्रम योग्यच आहे. विचार भारतीच्या उपक्रमांनी समाजात व तरुणांमध्ये वैचारिक प्रबोधन होत आहे, असे प्रतिपादन अस्थिरोग तज्ञ डॉ.राहुल पंडित यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जन्मदिना निमित्त विचार भारतीच्या वतीने नगर मध्ये खुल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन केले आहे. या स्पर्धेची प्राथमिक फेरी शुक्रवारी उत्साहात न्यू आर्ट्स महाविद्यालयात झाली. प्राथमिक फेरीच्या उद्घाटन प्रसंगी डॉ.राहुल पंडित बोलत होते. स्पर्धेचे उद्घाटन माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी विचार भारतीचे प्रवर्तक रवींद्र मुळे, उपाध्यक्ष अनिल मोहिते, सचिव सुधीर लांडगे, स्पर्धा प्रमुख बलभीम पठारे, न्यु आर्ट्स कॉमर्स व सायन्स महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.बाळासाहेब सागडे, परिक्षक इतिहास अभ्यासक प्रा.डॉ.नवनाथ वाव्हळ व प्रा.भरत होळकर, विचार भारतीचे सदस्य रवींद्र बारस्कर, प्रसाद सुवर्णपाठकी आदींसह जिल्ह्यातून व बाहेरील जिल्ह्यातून आलेले स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बाबासाहेब वाकळे यांचेही भाषण झाले. उपप्राचार्य बाळासाहेब सागडे यांनीही उपक्रमास शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविकात विचार भारतीचे सचिव सुधीर लांडगे यांनी विविध उपक्रमांची माहिती दिली. स्पर्धेची अंतिम फेरी ३१ मे ला होणार असून त्याच दिवशी विजेत्यांना पारीतोषिके देण्यात येणार आहेत, अशी माहिती स्पर्धा प्रमुख बलभीम पठारे यांनी दिली.

# जनता विद्यालयाची उज्वल निकालाची परंपरा कायम

**समाचार/नगर-दि.२५**

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे जनता माध्य. व उच्च माध्य. विद्यालय रुई छत्तीसी या विद्यालयाचा इ.१२वी विज्ञान शाखेचा निकाला १०० टक्के तर कला शाखेचा निकाल ९६.४६ टक्के लागला .विज्ञान शाखेत एकूण २०९ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाले होते तर कला शाखेत ११३ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते त्यापैकी १०९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

विज्ञान शाखेत नाईक श्रीकांत ८४.५०% प्रथम, शेख आयशा ७८.५०% द्वितीय, कुंजीर शुभांगी ७७.३३% तृतीय तसेच कला शाखेत झुंजार पायल ७५.६७%प्रथम, गव्हाणे आरती ७४.८३% द्वीतीय, भापकर मयुरी ७४.६७% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला. विद्यालयाच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रा.ह. दरे, उपाध्यक्ष डॉ.विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, खजीनदार ॲड.दिपलक्ष्मी म्हसे, सहसचिव जयवंतराव वाघ, जेष्ठ विश्वस्त जी.डी. खानदेशी, मुकेश दादा मुळे व सर्व पदाधिकार्यांनी, ग्रामस्थ व पालकांनी अभिनंदन केले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे प्राचार्य धामणे, पर्यवेक्षक दत्ता पाटील नारळे व सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# चव्हाण मुक्त विद्यापीठ पथकाची अहमदनगर महाविद्यालयास भेट

**समाचार/नगर-दि.२५**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या जुन २०२४ मधील परिक्षा सुरु आहेत, अहमदनगर जिल्हा पथक यांनी महाविद्यालयास भेट दिली. यावेळी पथकाचे अध्यक्ष डॉ. अशोक कोरडे हे उपस्थित होते.

पथकाचे अध्यक्ष डॉ. अशोक कोरडे म्हणाले की कॉपीमुक्त करण्यासाठी महाविद्यालयातील परीक्षा केंद्रावर सर्व परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी निकोप शैक्षणिक वातावरण ठेवणे गरजेचे आहे. परीक्षा नियमानुसार व सुरळीत पार पडाव्यात. परीक्षा दालनामध्ये विद्यार्थ्याने प्रवेश केल्यानंतर पर्यवेक्षकाने त्याचे ओळखपत्र तपासावे; तसेच हॉलतिकीट, त्यावरील फोटो व नाव तपासून हॉलतिकिटावर संबंधित पर्यवेक्षकाने स्वतःची; तसेच विद्यार्थ्यांची स्वाक्षरी वेळोवळी घ्यावी.

त्यामुळे परीक्षा दालनामध्ये काही गैरप्रकार घडणार नाहीत. आवश्यकता असल्यास शासकीय, निमशासकीय; तसेच पोलिस संरक्षणासाठी संबंधित विभागाकडे सहकार्य मागावे, कॉपी मुक्त विद्यापीठाच्या नियमानुसार परीक्षा पार पाडण्याच्या सूचना दिल्या

महाविद्याल्याचे प्राचार्य डॉ. आर. जे बार्नाबस यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पथकातील सदस्य डॉ चंद्रशेखर तळेकर, प्रा. संजय बाबर, डॉ. जी. एस गायकवाड बहिस्थ परिक्षक प्रा. संजय शिंदे, सहाय्यक प्रा. अजित साळवे उपस्थित होते.

## आ. संग्राम जगताप; पद्म उद्योजक शॉपिंग महोत्सवाचे उद्घाटन

# शॉपिंग महोत्सवातून नवउद्योजकांना करिअरची दिशा




**समाचार/नगर-दि.२५**

कष्टकरी विड्या वळण्याचे काम करणारा समाज अशी ओळख असणाऱ्या समाजातील काही माता भगिनीं, युवक मित्रांच्या पुढाकारातून गेल्या तीन वर्षापासून सुरू झालेल्या या शॉपिंग महोत्सवातून समाजातील महिला नवंउद्योजकांमध्ये नवचैतन्याचे वातावरण आहे. पहिल्या तीन पर्व तून अनेक महिलांना व्यवसाय, उद्योग उभारण्याची प्रेरणा मिळाली आहे. समाजाच्या कुठल्याही कामासाठी आम्ही कायम उपलब्ध आहोत, कधीही हाक द्या ,असे प्रतिपादन आमदार जगताप यांनी केले.

श्री मार्कंडेय संकुल येथे पद्मशाली युवा शक्ती संचलित पद्मशाली महिला शक्ती आयोजित 'पद्मउद्योजक शॉपिंग महोत्सव २०२४' च्या उदघाटन प्रसंगी आमदार जगताप बोलत होते. हा शॉपिंग महोत्सव २३ ते २६ मे पर्यंत चालणार आहे. प्रास्ताविक माजी नगरसेविका सुरेखा विद्ये यांनी केले. व्यासपीठावर नगरसेवक मनोज दुलम, माजी नगरसेवक ॲड. धनंजय जाधव,स्वामी समर्थ प्रतिष्ठान अध्यक्ष संदीप दातरंगे, सामाजिक कार्यकर्ते, प्रकाश कोटा, माजी नगरसेवक किशोर डागवाले, अभिजित खोसे, सुरेश बनसोडे, माजी नगरसेवक वीणा बोज्जा, पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे शरद क्यादर, संचालक राजू म्याना, मा. नगरसेवक श्रीकांत छिंदम, सामाजिक कार्यकर्ते सविता कोटा, मार्कंडेय नागरी सहकारी पतसंसंस्थेचे अध्यक्ष नारायण कोडम, एस राज टेलर्सचे संचालक गिरीश सुंकी, अहमदनगर फटका असोसिएशनचे अध्यक्ष श्रीनिवास बोज्जा, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक नारायण मंगलारम, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र विद्ये, क्रांती असंघटित कामगार संघटनेच्या अनिता कोंडा आदी उपस्थित होते. विविध क्षेत्रात यश मिळविणाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

# माहेश्वरी प्रिमियर लिग क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन



**समाचार/नगर-दि.२५**

माहेश्वरी युवा संघटनेच्या माध्यमातून समाजाचे संघटक उत्कृष्टपणे सुरु आहे. समाजातील प्रत्येक घटकांसाठी त्यांचे सुरु असलेले प्रयत्न कौतुकास्पद असेच आहे. युवा संघटना समाजातील सर्व घटकांसाठी करत असलेल्या प्रयत्नामुळे समाजोन्नत्तीचे काम होत आहे. त्यांच्या कार्यास आमच्या सदैव सहकार्य राहील, असे प्रतिपादन उद्योजक जितेंद्र बिहाणी यांनी केले.

महेश नवमीनिमित्त माहेश्वरी युवा संघटनेच्यावतीने प्रिमियर लिग क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन उद्योजक जितेंद्र बिहाणी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी माहेश्वरी युवा संघटनेचे अध्यक्ष शाम भुताडा, विशाल झंवर, गोविंदा जाखोटिया, अनिकेत बलदवा, गोविंद दरक, प्रतिक सारडा, पवन बंग, सुमित चांडक, पियुष झंवर, पवन बिहाणी, कुणाल लोया, संग्राम सारडा, अभिनंदन कालिया, योगेश सोमाणी, शेखर आसावा, सिद्धार्थ झंवर आदिंसह उद्योजक अशोक खटोड, प्रदीप अट्टल, डॉ.रमेश जाजू, मुकेश पल्लोड, गोवर्धन बिहाणी, सतीश काकाणी, विशाल लाहोटी आदि उपस्थित होते.

याप्रसंगी अध्यक्ष शाम भुताडा म्हणाले, सदर स्पर्धेत १६ संघ निवडण्यात आले आहेत. याचबरोबर महिलांसाठी वुमेन्स बॉक्स क्रिकट स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे. मुख्य प्रायोजक बांगडीवाला युनिट्री तसेच खडोट ग्रुप, गणेश टेक्सटाईल्स, जाजू डेंटल क्लिनिक, जी.डी.डी. मार्बल, मोना रसायन अमोनिया, अदित्य सोलर, ट्रेक कॅम्प, शशांक बंब आदींसह सहकार्य लाभत आहे. दरवर्षी होत असलेल्या स्पर्धेस उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे, असे सांगितले.

प्रकल्पप्रमुख सुमित बिहाणी, अमित खटोड, मुकुंद जाखोटिया, भुषण काबरा, गोविंद काकाणी म्हणून काम पाहत आहेत.

# नागर गुजराथी समाजाच्या अध्यक्षपदी ॲड.राजेंद्र गुजराथी



ॲड. राजेंद्र गुजराथी | विजयकुमार जामगांवकर | राजेंद्र गुजराथी | रवींद्र गांधी

**समाचार/नगर-दि.२५**

विसानागर वडनगरा महाजन ट्रस्ट या नागर गुजराथी समाजाच्या सभेमध्ये अध्यक्षपदी ॲड. राजेंद्र नटवरदास गुजराथी यांची निवड झाली आहे. गुजराथी हे रामकृष्ण अर्बन को ऑप. क्रेडिट सोसायटीचे माजी चेअरमन व विद्यमान संचालक आहेत. तसेच अखिल भारतीय वणिक नागर समाजाचे महाराष्ट्र झोनचे उपाध्यक्ष आहेत.

या सभेत उपाध्यक्षपदी विजयकुमार जामगांवकर, सेक्रेटरीपदी राजेंद्र भगवानदास गुजराथी, खजिनदारपदी रवींद्र (विठ्ठलशेठ) गांधी, सदस्यपदी इंजिनिअर दीपक गांधी, मनपाचे निवृत्त अधिकारी दिनेश गांधी, प्रकाश गांधी, बिपिन शहा, पंकज जामगांवकर यांची निवड करण्यात आली.

ॲड. राजेंद्र गुजराथी म्हणाले, आपल्या ट्रस्टला मोठी परंपरा आहे. समाजातील सर्वांना सोबत घेऊन आपण काम करू. या प्रतिष्ठित संस्थेच्या अध्यक्षपदाची धुरा सोपवल्याबद्दल सर्वांचे मनापासून आभार.

# तारकपूर आगाराची दर्शनयात्रा बस अयोध्येकडे मार्गस्थ




**समाचार/नगर-दि.२५**

तारकपूर आगारातर्फे काढण्यात आलेली अयोध्या दर्शनयात्रा बस शुक्रवारी (दि. २४) सकाळी आठ वाजता अयोध्येकडे मार्गस्थ झाली. अहमदनगर विभागीय वाहतूक अधीक्षक कमलेश धनराळे व सुरक्षा व दक्षता अधिकारी धर्मा पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून यात्रेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी भाविकांनी 'जय श्रीराम'चा जयघोष केला.

तारकपूर आगारातर्फे अयोध्या, काशी (वाराणसी), प्रयागराज यासह उज्जैन महाकालेश्वर, ओंकारेश्वर व ममलेश्वर या तीन ज्योतिर्लिंगाच्या दर्शनाची सोय असणारी अयोध्या दर्शनयात्रा आयोजित करण्यात येते. मार्च महिन्यात मिळालेल्या उदंड प्रतिसादानंतर शुक्रवारी आगारातर्फे ही दुसरी दर्शनयात्रा बस सोडण्यात आली. यावेळी विभाग नियंत्रक मनीषा सपकाळ, कामगार अधिकारी बाळासाहेब एकशिंगे आगार व्यवस्थापक अभिजीत चौधरी, आगार वाहतूक अधीक्षक श्विठ्ठल केंगारकर, वाहतूक निरीक्षक सुरेंद्र कंठाळे, सहायक वाहतूक निरीक्षक नितीन येणे, सहायक वाहतूक निरीक्षक गोविंद पेडियार, वाहतूक नियंत्रक काशिनाथ सुलाखे पाटील चालक राजेंद्र त्रिमुखे व सीताराम जगताप, वाहक जयदेव हेंद्रे यांच्यासह प्रवासी प्रतिनिधी शांता व संजयकुमार हजारे, संगीता व विजयकुमार हजारे, मंगल व विजय रावळे, गीतांजली व चंद्रकांत उकिर्ड, वंदना व सुभाष आबक, संध्याराणी व विठ्ठल चांडवले, पुष्पा व सीताराम ढोरजकर तसेच एसटी कर्मचारी, प्रवासी उपस्थित होते. सहा दिवसांचा प्रवास करून बुधवारी रात्री ही अयोध्या दर्शनयात्रा बस नगरला परतणार आहे.


**SASE DCORATERS**



Mandap, Light & Flower Decoraters

Add. Katvan Khandoba Road, Ahmednagar

9822331006, 9579544110

**1 BHK फ्लॅट विकणे आहे**

६७८ स्के. फूट, सेमी फर्निश्ड फ्लॅट विजयनगर चौक, के मार्ट बिल्डींग, हॉटेल जलसा शेजारी, भिंगार, अ. नगर

-: संपर्क :-

9766297773

**CHANGE IN NAME**

MY OLD NAME WAS **RAKESHKUMAR KAILASHCHANDRA KHANDELWAL.** MY NEW NAME IS **RAKESH KAILASH KHANDELWAL.** IT WILL BE USED FOR ALL FUTURE PURPOSES.

**नावात बदल**

माझे आधीचे दहावीपर्यंत नाव **घोगरे गायत्रीदेवी भागवतराव** होते. दहावी नंतर माझ्या सर्व शालेय व शासकीय कागदपत्रांवर आता माझे **नाव घोगरे गायत्री भागवतराव** असे आहे.

आधार कार्ड नं. 640982429897

**पाहिजेत**

सेल्समन/सेल्सगर्ल्स - ५ जागा

पॅकिंगसाठी महिला - ५ जागा

गुरु सुपरमार्केट झोपडी कॅन्टीनमागे, सावेडी, अहमदनगर

PREMIUM QUALITY Guru SUPERMARKET RICE FESTIVAL

**तांदूळ महोत्सव**

एकापेक्षा एक.. दर्जेदार व्हरायटी अनेक!

| | | | |
|---|---|---|---|
| आंबेमोहोर | 5kg | ~~450/-~~ | 399/- |
| मदर इंडिया | 5kg | ~~350/-~~ | 305/- |
| इंद्रायणी | 5kg | ~~320/-~~ | 290/- |
| चिन्नोर | 5kg | ~~370/-~~ | 320/- |
| कोलम डायमंड | 5kg | ~~425/-~~ | 375/- |
| कोलम नॉनस्टिम | 5kg | ~~435/-~~ | 385/- |
| काली मूछ | 5kg | ~~395/-~~ | 345/- |
| सेला बासमती | 5kg | ~~420/-~~ | 370/- |
| बासमती गुरु डायमंड | 5kg | ~~800/-~~ | 740/- |
| कोलम कणी | 5kg | ~~285/-~~ | 235/- |
| मिनी मोगरा | 5kg | ~~330/-~~ | 290/- |
| उकडा (बॉइल्ड) | 5kg | ~~280/-~~ | 240/- |

ब्राउन राईस (हातसडी) ब्राउन बासमती

गुरु सुपरमार्केट Since 2013 माऊली संकुलसमोर

झोपडी कॅन्टीन मागे, अहमदनगर फोन :०२४१-२४१७५७५ सोमवार बंद!

चंद्रभान आठरे पाटील ग्राम नवोदय ट्रस्ट, अ.नगर संचलित

**आठरे पाटील पब्लिक स्कूल, अ. नगर**

(इंग्रजी माध्यमाची निवासी, अनिवासी शाळा व ज्युनि. कॉलेज) वडगाव गुप्ता रोड, सावेडी एरिया, अ. नगर- 414003.

**शैक्षणिक वर्ष 2024-25 साठी प्रवेश**

E-mail :- apschool@rediffmail.com, Website :- atharepatilpublicscho.org

**11 वी विज्ञान व वाणिज्य शाखेत प्रवेश सुरू**

**कनिष्ठ महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये**

- पब्लिक स्कूल शिक्षण पद्धतीतील अग्रगण्य कनिष्ठ महाविद्यालय.
- शैक्षणिक वर्ष सन 2024-25 या नवीन वर्षासाठी 11 वी विज्ञान व वाणिज्य (इंग्रजी माध्यम) वर्गासाठी प्रवेश सुरू.
- अत्याधुनिक भौतिक सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता व शिस्त या त्रिसूत्रींचा वापर.
- विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच कला, क्रीडा वाढीस प्राधान्य.
- अद्ययावत जलतरण व अश्वारोहण या खेळांसहित 25 देशी-विदेशी खेळांची सुविधा.
- उच्च विद्याविभूषित, अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापक वर्ग.
- सर्व शालेय व कनिष्ठ महाविद्यालयीन परिसर सी. सी. टी. व्ही. नियंत्रणाखाली.
- विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित परिसर.
- 35 वर्षांची वैभवशाली सर्वोत्तम निकालांची परंपरा, गत 34 वर्षांपासून एस. एस. सी. बोर्ड परीक्षेच्या उत्कृष्ट 100% निकालाची परंपरा.
- वाणिज्य व विज्ञान शाखेकरिता आय. टी. विषय उपलब्ध.
- इंटरनेट व वायफायसह 60 लॅपटॉप, सुसज्जित संगणक प्रयोगशाळा.
- रसायनशास्त्र, जीवशास्त्र, भौतिकशास्त्र व आय. टी./संगणकशास्त्र विषयांसाठी स्वतंत्र अद्ययावत प्रयोगशाळा.
- सुसज्ज व समृद्ध ग्रंथालय (10,000 पुस्तकांसह)
- विद्यार्थ्यांसाठी पूर्णवेळ समुपदेशक व तज्ज्ञ डॉक्टर.
- अनिवासी विद्यार्थ्यांसाठी बस सुविधा उपलब्ध.
- 25 एकरांचा आल्हाददायक, निसर्गरम्य, शांत, विस्तीर्ण परिसर.
- निवासी मुला-मुलींसाठी स्वतंत्र, प्रशस्त, हवेशीर व सर्वसुविधांयुक्त सुसज्ज वसतिगृह (होस्टेल).

ऑफिस वेळ : स. 9 ते सायं. 5 वाजेपर्यंत
अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा
9130022228, 8888946012, 9881873919, 7350119367, 9423046718

ॲड. विश्वासराव आठरे पाटील, कार्यकारी विश्वस्त | डॉ. अनिल आठरे पाटील, अध्यक्ष

शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकाची रांगोळी

डागा **शांतीलाल डागा**

दाळमंडई/मार्केट यार्ड, अ. नगर ७५८८११५१५७/ ९८२२०८१४४०

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात | दिनांक - २४ मे ते ३१ मे २०२४

| | |
|---|---|
| जुनं फर्निचर | 1.45 PM, 7.20 PM |
| नाच गं घुमा | 5.00 PM, 8.00 PM |
| SRIKANTH | 4.40 PM, 10.15 PM |
| FURIOSA MAD MAX SAGA (ENG) (HINDI) | 7.40 PM; 2.05. PM, 10.30 PM |
| भैयाजी | 2.40 PM, 5.20 PM, 10.45 PM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher * - Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse

AVAILABLE ON book my show | CONNPLEX | AVAILABLE ON book my show

3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

**घरच्यासारखी वृद्ध/रुग्णसेवा**

वृद्धत्व-कॅन्सर-अपघात, शस्त्रक्रिया, स्मृतीभ्रंश इ. रुग्णांना घरच्यासारखी निवासी सेवा - शुश्रूषा. (सशुल्क)

**स्नेहदीप केंद्र** केडगाव, अहमदनगर

9011020176
9011026483
7499980845

(सहयोग - स्नेहालय)

**UNITED PHARMA**

Pharmaceutical Distributors

Near Kedgaon Ves, Kedgaon

9049934444
7972378081
9822020649




प्रोप्रा : किशोर मुदगल डी-१२, एमआयडीसी अहमदनगर 7219515144